ग्राममंगल
# शिक्षणवेध
वर्ष: सातवे । अंक : पहिला । जुलै २०१६
ISBN : 978-81-927549-0-1

## अंतरंग

संपादकीय / ५
रचनावादाचे शास्त्र आत्मसात करण्याची गरज / रमेश पानसे / ७

**विशेष विभाग : रचनावाद आणि शासन**
'ज्ञानरचनावादी बीट' :- मिशन नवसंजीवनी / डॉ. नेहा शिरोरे / ११
ज्ञानरचनावाद : एक यशस्वी प्रवास / अस्माकौसर व राजअहमद अब्बास देसाई / १६
प्रगतचा प्रवास ... / कैलास लोखंडे/२०
बीट प्रगत करताना... / प्रवीणकुमार श्रीराम काळम / २३
जिल्हा परिषद शाळेत रचनावादी अध्ययन : एक प्रेरणा/ मधुकर देशमुख / २८
रचनावादामुळे बदलले माणगाव / सीताराम मोहिते / ३१
माझा ज्ञानरचनात्मक अध्ययनप्रवास / अभय विजयसिंह परिहार / ३४

विनोदबुद्धी आणि शिक्षण / फारूक एस. काझी / ३६
खरी कमाई / सुचिता पडळकर / ३८
प्रतिक्रिया / अदिप्ती नातू / ४१
इ-लर्निंग / सौमित्र घोटीकर / ४२
समुपदेशकाच्या नजरेतून / गंपूदादा/ किशोरीताई / ४४



■
संपादक
रमेश पानसे
■
अतिथी संपादक
प्रतिभा भराडे
■
कार्यकारी संपादक
डॉ. वैखरी वैद्य
■
व्यवस्थापकीय संपादक
प्रसाद मणेरीकर

■
संचालक
अदिती नातू
■
कार्यकारी संचालक
अजित मंडलिक
■
संपादक मंडळ
डॉ. द. ना. धनागरे,
आशिष पेंडसे
डॉ. हेमचंद्र प्रधान,
विवेक सावंत

■
सल्लागार मंडळ
डॉ. राम ताकवले ,
डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर, प्रमोद लेले
दीपक घैसास,
डॉ. चंद्रहास देशपांडे
अच्युत गोडबोले
■
आतील चित्रे
डॉ. अपर्णा कुलकर्णी

■
मुखपृष्ठ व मांडणी
राजश्री जाधव
■
मुद्रितशोधन
मिलिंद बोरकर

## बदललेला संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार

फ्लॅट नं. १, न्यू इरा हाईट्स, गल्ली क्र.२०, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०२९
संवाद : ०२० २५४७२१४८ Email : shikshanvedh@grammangal.org

**पुणे कार्यालय**

गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७

**मुंबई कार्यालय**

अजित मंडलिक, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७. संवाद : ०९८६९०४९८४९
हे मासिक मुद्रक-प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी
इम्प्रेशन, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.

## महत्त्वाचे निवेदन

शिक्षणवेधच्या आर्थिक परिस्थितीची सविस्तर माहिती, एप्रिल २०१६ च्या संपादकीयमधून दिली होती. या अंकातूनच आर्थिक मदतीसाठी आवाहनही केले होते. वाचकांनी या आवाहनास प्रतिसाद दिला. आणि वर्गणीदार वाढवून अथवा अन्य मार्गाने मदत करू असे सक्रिय आश्वासन देऊन शिक्षणवेधचा अंक चालूच ठेवावा असा आग्रह धरला. आम्ही आपण आमच्यावर दाखवलेल्या लोभाप्रती कृतज्ञ आहोत. त्याचाच परिणाम म्हणून आहे त्याच मूल्यामध्ये मात्र पृष्ठ संख्या कमी करून शिक्षणवेधचे पुढील अंक प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. आपले असेच सहकार्य लाभेल असा विश्वास वाटतो.

। संपादकीय ।

# रचनावाद आणि शासन

सध्याचा काळ हा शैक्षणिकदृष्ट्या संक्रमणाचा काळ आहे. हे संक्रमण म्हणजे वरवरचे बदल नाही तर मुळापासून बदल होतील, व्हाव्यात अशा अनेक घटना आज आजूबाजूला घडत आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा बदल आहे तो ‘वर्तनवादाकडून रचनावादा’कडे झालेल्या संक्रमणामुळे.

या दृष्टीने २०१५ हे शैक्षणिक वर्ष महाराष्ट्रात ‘शैक्षणिक क्रांती’चे वर्ष ठरले. त्यापूर्वी शिक्षणात असणाऱ्या समस्या, त्यावरचे उपाय यांची चर्चा व्हायची. शिक्षणात कोणी चांगलं काम करत नाही अशी हळहळ व्यक्त केली जायची. शिक्षणक्षेत्रात विशेषत: जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण दिले जात नाही. शिक्षक काम करत नाहीत. विद्यार्थीही शिकत नाहीत. समाजापुढे सरकारी शाळांचे चित्रे असे उभे होते. त्यामुळे शासकीय शाळांत दिवसेंदिवस विद्यार्थी संख्या घटताना दिसत होती. शिक्षक मुलांना व्यवस्थित शिकवतच नाहीत. त्यामुळे शाळेत गुणवत्तादेखील दिसत नाही. अशी सकृद्दर्शनी दिसणारी परिस्थिती होती. वास्तविक पाहता ज्या पद्धतीने मुलांना शिकवलं जात होते, त्या पद्धतीमुळे या समस्या निर्माण झाल्या होत्या. वर्गात अतिरिक्त शिस्तीचे वातावरण होते. बक्षीस, शिक्षा यांनाच विनाकारण महत्त्व दिले जात होते. शिक्षक शिकवणार आणि त्यापद्धतीने मुले शिकणार, त्यातही मुलांनी ऐकायचे व शिक्षकांनी बडबडायचे यालाच प्राधान्य होते. मुलांच्या अनुभवविश्वाचा, भावविश्वाचा विचार ना शाळांमध्ये केला गेला ना एकूण शिक्षणप्रक्रियेत केला गेला. त्याचा परिणाम सर्वच शाळांत (खाजगी-सरकारी) दिसत होता. गळतीचे प्रमाण वाढले होते.

कित्येक मुलांनी मध्येच शाळा सोडल्या. कितीतरी मुले संकल्पना न समजता शाळेत राहिली. केवळ कागदावर शिकती झाली. हे अपयश सर्वांनाच मान्य होते. ते दूर करण्याचा प्रयत्न करण्याची तयारीही होती. मात्र त्यासाठी मार्ग कोणता वापरावा, शास्त्रीयदृष्ट्या याला कसे तोंड द्यायचे हे

लक्षात येत नव्हते. परिणामकारक उपाय सापडत नव्हता.

सुमारे २०१२ पासूनच 'मूल समजून घेऊन काम करण्याचे' काम कुमठे बीटमध्ये सुरू होते. २०१५ साली ते मान. शिक्षणसचिवांच्या निदर्शनास आले आणि मग खऱ्या अर्थाने इतिहास घडला. संपूर्ण महाराष्ट्रानेच हे काम पाहावे असे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक मूल शिकू शकते. शिक्षण प्रवाहात टिकू शकते हे सगळ्यांच्याच लक्षात आले. त्यापासून प्रेरणा घेऊन अनेकांनी आपापल्या परीने भर घातली आणि मग सुरू झाले 'शैक्षणिक अभियान'. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मूल शिकण्याच्या अंगाने विचार होऊ लागला. डोंगर, पाड्या, वस्त्या, आदिवासी, बहुजन समाज, आर्थिक मागासलेले - समाजातील सगळ्याच स्तरातील मुले कशी शिकती होतील याचा अभ्यास शिक्षक करू लागले. त्यांना शिकवायच्या वेगवेगळ्या आणि परिणामकारक पद्धती शोधल्या जाऊ लागल्या. शास्त्रीयदृष्ट्या शैक्षणिक साधने, उपक्रम यांची निर्मिती झाली. मुलांच्या अनुभवविश्वातील, दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा समावेश करून घेऊन ती शिक्षण घेऊ लागली.

शिक्षण हे 'विद्यार्थीकेंद्री' असले पाहिजे. तरीही त्यात शिक्षकाची भूमिका फार महत्त्वाची आहे. 'शिक्षकांना व मुलांना माणुसकीने वागवा' हा प्रधान सचिवांचा विचार अधिकाऱ्यांच्या मनात ठसला. आज अधिकाऱ्यांचे व शिक्षकांचे नाते मैत्रीचे आहे. मूल व शिक्षक हे नाते मैत्रीचे आहे. या नातेसंबंधातील बदलामुळे देखील शिक्षणात बदल झाला आहे.

शिकण्याचा अवयव म्हणजे मेंदू. या मेंदूशिक्षणाचा- मूल शिकते कसे या सगळ्याचा विचार शिक्षणात केला जात आहे. या शास्त्रीय अभ्यासावर आधारित नवीन शिक्षणविचार आहे. शिकण्यातील अडथळे दूर करण्यासाठी काय करावे लागते याचा प्राधान्याने विचार केला जात आहे. मुलांना खेळायला, व्यक्त व्हायला; वर्गात-परिसरात स्थान आहे. शाळेतील वातावरण चैतन्यपूर्ण कसे राहील याकडे लक्ष दिले जात आहे. हा बदल व्हायला महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचा बदललेला दृष्टिकोन कारणीभूत आहे. हा बदल घडवण्यास शिक्षणक्षेत्रातील सर्वच घटक कार्यरत झाले आहेत हे लक्षणीय आहे.

या अंकात प्राचार्य, उपशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी यांनी अधिकारी म्हणून नव्हे तर समाजातील जबाबदार घटक म्हणून, माणूस म्हणून केलेले काम तुमच्यासमोर उभे राहील. गुणवत्तेच्या दृष्टीने झालेली वाटचाल स्पष्ट होईल आणि संपूर्ण महाराष्ट्रच आता शैक्षणिकदृष्ट्या प्रगतीपथावर आहे याची खात्री पटेल. या अंकाचेही हेच फलित आहे.


**प्रतिभा भराडे**

**मो. ९८५०५३७६६०**

अतिथी संपादक

# रचनावादाचे शास्त्र आत्मसात करण्याची गरज

मी अलीकडे जिल्हा परिषदांच्या शाळांच्या सहवासात असतो; त्यांच्या शिक्षकांशी बोलतो, त्यांचे वर्ग व विद्यार्थी न्याहाळतो. माझ्या लक्षात असे आले की, जिल्हा परिषदांचे बरेचसे शिक्षक आणि शिक्षिका स्वयंप्रेरणेने प्रत्यक्ष वर्गांमधील शिकण्या-शिकविण्याच्या व्यवहारात खूप मोठे, उपयुक्त असे बदल करीत आहेत. त्यात त्यांची मानसिक गुंतवणूक मला दिसते आहे. त्यांच्या कल्पना, त्यांची मर्मदृष्टी, त्यांची प्रतिभा खूप मोठे योगदान देत आहे. शिक्षणाच्या वाढल्या गुणवत्तेत त्यांच्याकडून होणारे वर्धित मूल्याचे प्रमाण (value addition) मोठे आहे, हे कदाचित त्यांनाही माहीत नसेल.

शिक्षणहक्क कायद्याच्या (२००९) पाचव्या प्रकरणातील २९व्या कलमात म्हटले आहे की, 'जर विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाची निर्मिती करता येईल अशा रीतीने वर्गांमधील अनुभवांची मांडणी व्हायची असेल तर, शालेय व्यवस्थेत अंगभूत स्वरूपाचे मोठे बदल करावे लागतील.

महाराष्ट्रात असे बदल होऊ लागले आहेत. शालेय वर्गातील-शाळेतील व्यवस्थेत रचनावाद बऱ्यापैकी पसरला आहे, असे आज आढळून येते. अनेक शाळांनी जमिनी, हा एरवी शिक्षणप्रक्रियेत न वापरलेला घटक वापरायला सुरुवात केली आहे. कित्येकांनी जमिनी शैक्षणिक अंगाने रंगविल्या आहेत. काही खेळ, काही उपक्रम या जमिनीवर बसून विद्यार्थी करू पाहत आहेत. त्यामुळे शाळेत काही बदल होतो आहे, हे शाळेत येणाऱ्या पाहुण्यांना, गावकऱ्यांना सहजपणे कळते आहे. सुरुवात म्हणून ही गोष्ट चांगलीच आहे.

शाळांच्या भिंतींवर मात्र वर्तनवादी आणि रचनावादी अशा दोन्ही विचारांना स्थान देतील असे तक्ते, सुविचार, माहिती, शासकीय सूचना अशा गोष्टी दिसून येतात. हा बदलाचा सुरुवातीचा काळ म्हणून मानता येईल. भिंतींच्या वापराबद्दल फारसा सयुक्तिक विचार मात्र होत नाही, असे जाणवते. रचनावादी शिक्षणात भिंतींवर कोणत्याही गोष्टी कायमस्वरूपी असू नयेत, असा संकेत आहे. काही गोष्टी रोज किंवा आठवड्याला बदलतील, तर काही गोष्टी महिना-दोन महिन्यांनी. शाळांच्या भिंतींवर बरेचसे फोटो टांगलेले असतात, त्यांतले शक्य तेवढे काढून टाकले तर मुलांना अशा जागा त्यांच्या अभिव्यक्तीसाठी उपलब्ध होतील. इयत्तांनुसार भिंतींवरील जागांची वाटणी अर्थातच करता येईल.

भिंतींवर काय नसावे याचबरोबर काय असावे, हे महत्त्वाचे आहे. यासाठी दोन गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. एक म्हणजे, भिंती हा वर्ग-वातावरणाचा भाग आहे. त्यामुळे वर्गाच्या शैक्षणिक वातावरणात भिंतींना सामावून घेणे इष्ट ठरते. तसेच, विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीसाठी भिंती ही एक सोईस्कर जागा असते आणि त्यावरील आपल्या कामाचे प्रदर्शन हे विद्यार्थ्यांना प्रोत्साहित व प्रेरित करणारे असते.

तिसरा महत्त्वाचा बदल ठळकपणे लक्षात येत आहे, वर्गातील बाकांना रजा देऊन मुलांना छोट्या गटांत बसवायला अनेक ठिकाणी सुरुवात झाली आहे. कित्येक ठिकाणी वर्गातून बाके हलविण्यात काही अडचणी



आहेत, पण तिथेसुद्धा बाके भिंतींशी लावून मध्यभागी मुलांना जमिनीवर बसण्यासाठी जागा केली जाते. विद्यार्थ्यांनी जमिनीवर छोट्या गटात बसण्याची पद्धत आता रुळायला लागलेली दिसते. तरीसुद्धा शिक्षकांना आवर्जून लक्षात घ्यायला हवी आहे; ती गोष्ट म्हणजे, गट हे त्या-त्या वेळच्या अध्ययनाच्या हेतूंनुसार असावे लागतात. गट हे अनेक कारणांनी बदलतही जातात आणि मुख्य म्हणजे गट हे सहकारी शिक्षणाला पायाभूत असल्यामुळे सहकारी शिक्षणातील तत्त्वांचीही झालर त्यांना असावी लागते. या दिशेने शिक्षक-शिक्षिकांनी अधिक माहिती घेणे उपयोगाचे ठरेल.

चौथा महत्त्वाचा आणि सररास सगळीकडे आढळणारा बदल म्हणजे, आता शाळांतून शैक्षणिक साधनांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जात आहे. काही शासनाने पुरविलेली, काही विकत घेतलेली, तर काही शिक्षकांनी स्वतः केलेली आहेत. ही साधने अन्य ठिकाणी पाहून तशीच तयार करून वापरली जात आहेत, तर शिक्षकांनी आपल्या कल्पकतेतून काही नव्याने निर्माण केलेली आहेत. उत्साहाने साधने निर्माण होणे वेगळे आणि त्यांच्या निर्मितीमागे काही शास्त्रीय दृष्टिकोन असणे वेगळे आहे. जे साधन आपण वर्गात मुलांसाठी वापरू इच्छितो; ते मुलांना हाताळण्यास सोईचे, सुरक्षित आणि मुलांना आवडेल असे हवेच. पण तेवढेच पुरेसे नाही. शैक्षणिक साधनाची शास्त्रीयता ही त्याच्या हेतुपूर्ण वापरात आणि हेतुपूर्ण विद्यार्थी प्रतिसादात असते. साधनाकरवी जे घडवायचे, ते नेमके व स्पष्ट असले पाहिजे आणि तसे त्यातून अंतिमतः घडलेही पाहिजे. साधन हे केवळ आपल्याला काय वाटते यावर किंवा इतरांच्या ऐकीव अनुभवांवर बेतलेले असून चालणार नाही. त्यामागील दृष्टिकोन अशास्त्रीय तर नाही ना, याची शहानिशा व्हावी लागेल. साधने वयानुरूप, शिकण्याच्या घटकांनुरूप तसेच ती विद्यार्थ्यांना आव्हानरूप वाटतील अशी अर्थातच, असावी लागतील. साधननिर्मिती आणि साधनांचा वापर यांबद्दलचे शिक्षकांचेही सातत्यपूर्ण प्रशिक्षण व्हावे लागेल.

आजच्या बदलाच्या या पायरीवरून आता वर्गातील प्रत्यक्ष चालणाऱ्या प्रक्रियांवर लक्ष केंद्रित व्हायला हवे. या अपेक्षित शिक्षणप्रक्रिया गेल्या अर्धशतकात विविध शास्त्रांमधील सिद्धांतांतून उगम पावलेल्या आहेत. शिक्षणपद्धतींचा फार मोठा संबंध त्यांमागे असणाऱ्या सैद्धांतिक विश्वाशी नेहमीच असतो. पियाजेचे १९६० पूर्वीचे संशोधन व बौद्धिक विकासाच्या पायऱ्यांचे सिद्धांतन, त्यावर व अन्य शास्त्रीय संशोधनांवर आधारलेले सन १९६०च्या दशकातील आकलनशास्त्र,

त्यानंतरच्या काळातील ब्रुनरचा आकलनविषयक विकासाचा सैद्धांतिक विचार, सन १९७० च्या दशकापासून वेग आलेली मेंदूविषयक संशोधनांची मांदियाळी, सन १९८०च्या दशकातील रॉबर्ट गॅग्ने यांचा अध्यापनविषयक सिद्धांत व त्यांचे शिकण्याविषयीचे निकष या आणि अशा अनेकांच्या सैद्धांतिक विचारांनी अध्यापन व अध्ययन या वर्गशिक्षणातील मध्यवर्ती संकल्पनांचा चेहरा-मोहराच पार बदलून टाकला आहे. त्यांना नेमकेपणा देऊन शिक्षणव्यवहारांच्या संदर्भात अधिक स्पष्टता आणली आहे.

शिक्षणातील बदलांमागचे हे तत्त्वज्ञान, सिद्धांतन आणि दृष्टिकोन शिक्षकवर्ग व अधिकारी वर्ग यांना पुरेसा आत्मसात होण्याची गरज आहे. आणखी एक गोष्ट अशी की, शिक्षकांनी सैद्धांतिक विचार आत्मसात करून त्यांची दैनंदिन शिक्षण-व्यवहारांशी सांगड घालत गेल्याशिवाय सिद्धांतन व व्यवहार यांत आज असलेले फार मोठे अंतर भरून निघणार नाही; आणि अर्थातच, शिक्षणात अपेक्षित असलेली उच्च प्रतीची गुणवत्ताही साध्य होणार नाही.

**२२ मे २०१६ रोजी रविवार सकाळ सप्तरंग पुरवणीत हा लेख प्रसिद्ध झाला. या लेखावरती विविध प्रतिक्रिया आल्या. त्या उपस्थित केलेल्या प्रश्नांवरती दिलेली ही उत्तरे:**

# मूल्यवर्धन व रचनावादी शिक्षणपद्धती

मी मूल्यांचा- विशेषत: भारतीय राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय्यता या नागरिकत्वाच्या चार पायाभूत मूल्यांचा- संबंध महाराष्ट्रात पसरू लागलेल्या रचनावादी शिक्षणपद्धतीशी बांधतो आहे. तो दोन स्तरांवर. एक म्हणजे, शिक्षणाच्या आशयाशी व त्यांतून घडून येणाऱ्या अंतिम उद्दिष्टांशी; आणि दोन- नव्या रचनावादी शिक्षणपद्धतीचा एक अंगभूत भाग म्हणून. हा दोन्ही स्तरांवरचा 'मूल्य'संबंध अधिक स्पष्ट करता येईल.

**१) शिक्षणाचा आशय, शिक्षणाची उद्दिष्टे :**

लोकशाही स्वरूपाच्या भारतासारख्या राज्य-अर्थ-समाजव्यवस्थेमध्ये स्वच्छ-शुद्ध नागरिकत्वाची रुजवण आणि जोपासना हीच शिक्षणातील व्यवहारांची मूलभूत उद्दिष्टे असावी लागतात. ('स्वच्छ' हा शब्द सर्व प्रकारच्या भ्रष्टाचारी वागणुकीपासून दूर असणे, असा इथे लावायचा; तर 'शुद्ध' हा शब्द अव्यभिचारी म्हणजे तथाकथित धर्म, जाती, वर्ग, लिंग भेदातीत नागरिकत्वाची वागणूक असा इथे घ्यायचा.) समाजातील सर्वच व्यवहार प्रामुख्याने समाजातील अन्य व्यक्तींबरोबर असतात आणि ते अन्य व्यक्तींच्या हिताला बाधा निर्माण करणार नाहीत असेच असावे लागतात. व्यवहारात असे वागणे हे उपजत जनुकांमधून येत नाही; तर ते मनुष्याला शिकून आपलेसे करावे लागते, मनात ठसवावे लागते आणि प्रत्यक्ष वागणुकीत उतरवावे लागते. प्रत्येक माणसाबाबत स्वतंत्रपणे असे घडावे लागते, म्हणून ते शिक्षणातील सार्वत्रिक स्वरूपाचे उद्दिष्ट ठरते. शिक्षणव्यवहारांच्या सर्वच पातळींवरील शिक्षण-आशय या दिशेने जबाबदारी घेणारा असावा लागतो. हा आशय म्हणजे मूल्याधारित शिक्षण होय!

**२. रचनावादी पद्धतीतील मूल्यांचे अंगभूत स्थान :**

ज्या रचनावादी शिक्षणप्रणालीचा अवलंब आपण शिक्षणात करू पाहत आहोत, त्यातील पायाभूत अशी दोन तत्त्वे ही व्यक्तिगत स्तरावरची पण व्यापक

समाजहिताशी नाते सांगणारी अशी आहेत. एक आहे स्वयंअध्ययनाचे, स्वयंशिक्षणाचे तत्त्व आणि दुसरे आहे ते करून, अनुभवांतून शिकण्याचे तत्त्व.

स्वयंशिक्षणाच्या तत्त्वामध्ये स्वत:च्या शिकण्याचे स्वत: नियंत्रण करणे आणि स्वत:च्या शिकण्याची स्वत: जबाबदारी घेणे हे येते. शुद्ध नागरिकत्वामध्ये स्वत:च्या वागणुकीचे स्वत: (विचारपूर्वक) नियंत्रण करणे आणि स्वत:च्या वागणुकीची, त्याच्या परिणामांचीही जबाबदारी स्वत: घेणे अभिप्रेत असते. या दोन्हींची रचनावादी शिक्षणपद्धतीत व्यवस्थितरीत्या सांगड घालता येते. उदाहरणार्थ- जेव्हा शिक्षण वर्गाबाहेरील समाजजीवनाशी जोडण्याचा प्रयत्न आपण करतो, तेव्हा आपण मुलांना वर्गांमधील बहुश: एकांगी अनुभवांतून तर बाहेर काढतच असतो; पण दुसरीकडे समाजजीवनातील व्यक्ती व घटना यांचे अनुभव घ्यायला उद्युक्त करतो. हे अनुभव अन्यायांचे असतात, न्यायाचेही असतात. अन्यायांकडून न्यायाकडे- अशी त्यांची मुलांच्या मनांवर ठसविणारी दिशा असावी लागते. हे अनुभव सहकाराचे, सहिष्णुतेचे असावे लागतात त्याचबरोबर संघर्षांचेही अपरिहार्यपणे असावे लागतात.



आवश्यक वाटल्यास,. संघर्षातून समजाहिताकडे अशी त्यांची दिशा अपेक्षित असते. न्याय्यतेचे मूलभूत तत्त्व त्यातून विकसित होत जाते.

रचनावादी शिक्षणव्यवहारांमध्ये वैयक्तिक पातळीवरील शिकण्याच्या वागणुकीविषयी आपण आग्रही असतो. त्यासाठी मुलांच्या स्वातंत्र्याचाही आग्रह आपण धरतो. स्वातंत्र्याने स्वत:च्या वागणुकीचे नियंत्रण स्वत: करण्याची ओढ लागते आणि त्याचबरोबर स्वत:च्या शिकण्याची जबाबदारी स्वत:कडे घेऊन त्यातून वागणुकीबाबतची स्वयंशिस्तही अंगी बाणते, असा अनुभव येतो. प्रौढपणे समाजात स्वतंत्रतेने आपली वागणूक विचारपूर्वक ठरविण्याचे भान येते आणि त्याची पायाभरणी ही अशी शालेय वर्गांमधून होऊ शकते.

रचनावादी वर्गशिक्षणात एक छोटी, पण परिणामांनी मोठी अशी गोष्ट आपण आणली आहे. ती म्हणजे, मुले ओळीत व बाकांवर न बसता छोटच्या-छोटच्या गटांतून बसतात आणि परस्परसाह्याने अध्ययन करतात. या पद्धतीत सातत्याने वावरल्याने, मुले छोटच्या समाजजीवनाचा, त्यातील परस्परसाह्याचा, परस्परांकडून शिकण्याचा, विचारांचा, कल्पनांचा अनुभव घेतात. सहकाराचे, बंधुत्वाचे मूल्य यातूनच अंगी येण्याची शक्यता निर्माण होते. यांमधून वर्गात होणारे समतेचे वातावरण भावी काळाच्या समाजजीवनातील समतेची भावना निर्माण करणारे, असू शकते.

गरज आहे ती शिक्षकवर्गाने रचनावादी शिक्षणतत्त्वांची भारतीय घटनेतील मूल्यांशी आपल्या स्वत:च्या मानसस्तरावर घट्ट सांगड घालण्याची. जे मनात असते, ते दैनंदिन व्यवहारात उतरणे सहजच शक्य असते!

**मो. ७५०७८०१९९९**

विशेष विभाग :
रचनावाद आणि शासन

डॉ. नेहा शिरोरे
शिक्षण विस्तार अधिकारी
निफाड, ता. जि. नाशिक

# 'ज्ञानरचनावादी बीट' :- मिशन नवसंजीवनी

महाराष्ट्र हे आपले राज्य पुरोगामी विचारांचा वारसा लाभलेले असून शिक्षणक्षेत्रातही नेहमी आघाडीवर राहिलेले आहे. महाराष्ट्रात शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध कार्यक्रम, उपक्रमांची अंमलबजावणी वेळोवेळी करण्यात आली होती. त्याने शिक्षणक्षेत्रात परिवर्तन घडविण्याचे कार्यही काही प्रमाणात यशस्वी होत होते; परंतु मुलांना शाळेत 'शिकवायचे' नसून त्यांचे 'शिकणे' व्हावे व तेही आनंदाने, त्यांच्या कलाने, त्यांच्या आवडीने हे मात्र शिक्षणक्षेत्रात स्वीकारलेले दिसत नव्हते. त्या दृष्टीने एक नावीन्यपूर्ण कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे शिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा. नंदकुमारसाहेब यांच्या प्रेरणेने दि. २२ जून २०१५ रोजीच्या शासननिर्णयाने जाहीर झाला आणि तो म्हणजे 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र'.

सुरुवातीला या कार्यक्रमाबाबत असाच विचार सर्वत्र दिसून येऊ लागला की, आता पुन्हा एक नवा उपक्रम '-कागदावर येणार आणि कागदावरच जाणार'. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या अंमल-बजावणीसाठी माझ्या बीटातील शिक्षक मित्र- मैत्रिणींशी चर्चा करताना असे लक्षात आले की, यापूर्वीच्या काही कार्यक्रमांचा त्यांचा अनुभव फारसा चांगला नव्हता. त्या कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांची अपेक्षित गुणात्मक प्रगती होण्याऐवजी फक्त संख्यात्मक व 'कागदी' प्रगतीवर भर असल्याचे अनुभव त्यांनी व्यक्त केले. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शिक्षकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक होते. त्या दृष्टीने कुमठे बीटला भेट देण्याचा विचार शिक्षकांजवळ बोलून दाखविला. शिक्षकांनी या अभ्यास दौऱ्याला एक सहल म्हणून स्वीकारले व दि. २४ जुलै २०१५ रोजी कुमठे बीटातील शाळांना भेट दिली आणि तेथील विद्यार्थ्यांची प्रगती पाहून मनात सहजच शब्द उमटले,

या कोवळ्या कळ्यांमधी
लपले ज्ञानेश्वर अन् शिवाजी
विकसिता प्रकटतील येथे शेकडो महापुरुष

कुमठे बीटाच्या भेटीनंतर सर्वच शिक्षकांच्या मनांत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास सुरुवात झाली. शिक्षकांना प्रेरणा देण्यासाठी कार्यप्रेरणा कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. दि. १ ऑगस्ट २०१५ रोजी कुमठे बीटास भेट देऊन आलेल्या व भेटीस न गेलेल्या शिक्षकांमध्ये विचारांची देवाण-घेवाण हवी, यासाठी बीटस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यांचे अनुभव ऐकून शिक्षकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली. आपणही हे करू शकतो, असे शिक्षकांना वाटू लागले. याच कार्यशाळेस शुभेच्छा देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे शिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा. नंदकुमारसाहेब यांचा दूरध्वनीद्वारे शुभेच्छा संदेश शिक्षकांना मिळाला. शिक्षण विभागाचे सर्वोच्च अधिकारी एखाद्या बीटातील शिक्षकांशी फोनद्वारे संवाद साधतात, या गोष्टीने शिक्षक हरखून गेले आणि मग काय- माझ्या शिक्षक मित्र-मैत्रिणींनी रचनावादाच्या मदतीने शाळा प्रगत करण्याचा जणू विडाच उचलला अन् ते त्यासाठी झपाटून कामाला लागले. अशी ही प्रचंड ऊर्जा देणारी प्रेरणा घेऊन १ ऑगस्ट २०१५ पासून 'प्रगत



शैक्षणिक महाराष्ट्र' या कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी निफाड बीटात सुरू झाली.

दि. ३० ऑगस्ट २०१५ रोजी पंचायत समिती निफाडची मासिक सभा असताना या सभेत शिक्षकांच्या या नव्या कार्याची सभापतींसह सर्व पदाधिकाऱ्यांना माहिती करून दिली. शासनाच्या 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या आशादायी उपक्रमाविषयी माहिती दिली आणि विनंतीपूर्वक हेही सांगितले की, सध्या माझे शिक्षक हे ज्ञानरचनावाद या नव्या पद्धतीचा अध्यापनात अवलंब करीत आहेत. 'चुका आणि शिका' या मार्गाने ते स्वत: जात आहेत; म्हणून सर्वांनी त्यांना त्यांच्या कामास शाबासकी देऊन सहकार्य करावे व बीटातील शाळांना सर्वांनी भेटी देऊन हा नवा बदल सकारात्मक रीतीने समजावून घ्यावा, अशी विनंती केली. याच्या परिणामी, पदाधिकाऱ्यांच्या मनांत शिक्षकांप्रती एक सुयोग्य दृष्टिकोन निर्माण करण्यास मदत झाली.

दि. १ ऑगस्टपासून बीटातील ३९ शाळांमध्ये सर्वत्र वर्ग-आरेखन सुरू होते. हे करताना शिक्षकांनी स्वत:च्या खिशातून पैसे खर्च करून वर्गातील वातावरण आनंददायी व मुलांच्या शिकण्यास उपयुक्त असे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे मुले शाळेत रमू लागली.

दि. १७ ऑगस्ट २०१५ रोजी शैक्षणिक साहित्य-निर्मितीची कार्यशाळा घेण्यात आली व सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य शिक्षकांनी तयार केले. यात भाषा, गणिताचे साहित्य तयार करताना पाठ्यक्रमाचा विचार करून- एवढेच नव्हे तर काना, मात्रा, वेलांटी, उकार, ऋकार अशा सर्व प्रकारच्या शब्दांच्या शब्दपट्ट्या, वाक्यपट्ट्या, अंकपट्ट्या, तक्ते असे विविध प्रकारचे साहित्य तयार केले. आता सर्वत्र आरेखन व साहित्यासह विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू झाले. तरीही ज्ञानरचनावाद या संकल्पनेमागे मानसशास्त्रीय आधार काय असावा व तो आपल्या शिक्षकांना समजावा, यासाठी दि. १६ सप्टेंबर २०१५ रोजी स्वत: मा. प्रतिभा भराडे, विस्तार अधिकारी, कुमठे बीट आणि गटशिक्षणाधिकारी नामदेव माळी सर यांच्या कार्यशाळेचे आयोजन बीटात केले. त्यांनी ज्ञानरचनावादावर आधारित सैद्धांतिक मार्गदर्शन करून 'मूल नेमके कसे शिकते?' हे अत्यंत साध्या व सोप्या भाषेत समजावून सांगितले. पुन्हा नव्या जोमाने कामास सुरुवात झाली.

प्रत्यक्ष या पद्धतीचा वापर करताना शिक्षकांना येत असलेल्या अडचणी समजावून घेऊन त्या सोडविण्यासाठी कुमठे बीटातील शिक्षकांनी मागणी केली आणि मा. नंदकुमारसाहेब व भराडे ताई यांनी ती सोडविली. दि. १२ ऑक्टोबर २०१५ रोजी कुमठे

बीटातील शिक्षकांनी निफाड बीटात कार्यशाळा घेतली आणि शिक्षकांना सुयोग्य मार्गदर्शन केले.

दि. २ ते ६ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत निफाड बीटातील शिक्षकांच्या इयत्तानिहाय कार्यशाळेचे आयोजन बीटातीलच शिक्षकांद्वारे करण्यात आले आणि त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला.

दि. १ ते २५ डिसेंबर २०१५ या कालावधीत शिक्षक- -शिक्षक आंतरक्रिया वाढविण्यासाठी बीटातील शिक्षकांच्या, बीटातीलच उत्तम काम करणाऱ्या शाळांना भेटी घडवून आणल्या. यातून आपल्याच बरोबरचे आपलेच सहकारी जर हे करू शकतात, तर आपणही करू शकतो- असा एक विश्वास या कामात मागे असणाऱ्या शिक्षकांना मिळाला व त्यांनीही काम करण्यासाठी प्रयत्न वाढविण्यास सुरुवात केली.

शाळांमध्ये झालेले हे बदल व मुलांच्या शिकण्यातील वाढलेली गती गावालाही समजावी, म्हणून केंद्रस्तरावर एका केंद्रांतर्गत येणाऱ्या सर्व शाळांच्या गावांचे जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य (आजी- -माजी), सरपंच, उपसरपंच, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य आणि मुख्याध्यापक अशा सर्वांच्या एकत्रित केंद्रस्तरीय बैठका घेतल्या. या कार्यशाळेत त्यांच्या गावातील शाळेत घडणाऱ्या सकारात्मक गोष्टी, विद्यार्थी-प्रगती यांची माहिती व्हिडिओ सादरीकरणाद्वारे दिली.

''गाव तुमचे, शाळा तुमची, मुलं तुमची आणि मग ही मुलं चांगली शिकली पाहिजेत यासाठी शासनाने गणवेश दिला, पोषण आहार दिला, पुस्तकं दिली, इमारती दिल्या; आता यापुढे गावाच्या शाळेला काय हवं--नको ते तुम्ही बघायचे'' असे सांगून संपूर्ण शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत सदस्य टीम यांनी गावाची शाळा दत्तक घेण्याचेही भावनिक आवाहन करण्यात आले. याच्या परिणामी, प्रत्येक शाळेस कमीत कमी पाच हजार ते जास्तीत जास्त पाच लाखांपर्यंतचा निधी लोकसहभागातून उपलब्ध झाला. त्यातून शिक्षकांनी शाळेचे अंतरंग तर बदललेच, पण त्याबरोबर बाह्यांगसुद्धा बदलले. अनेक शाळांमध्ये परसबागा तयार झाल्यात, पेव्हरब्लॉक बसविले गेले. यातून आणखी एक महत्त्वाची गोष्ट साध्य झाली. ती म्हणजे, समाजाचा शिक्षकांवर विश्वास वाढू लागला. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे- शिवरे केंद्रातील दिंडोरी गावातील सरपंच श्री. संदीप तासकर यांनी तर दिंडोरी शाळेच्या मुख्याध्यापकाकडे स्वत:चे एटीएम कार्ड दिले व शाळेस पाहिजे तो खर्च करण्याचे स्वातंत्र्य दिले! असा मोठ्ठा विश्वास माझ्या शिक्षक मित्राप्रति समाजाचा निर्माण झाला.



गावाशी व गावातल्या समाजाशी, तिथल्या लोकप्रतिनिधींशी अशा प्रकारे संपर्क साधल्याने अनेक अशक्य, दुर्लक्षित व विचारात न घेतली जाणारी शाळांसंबंधीची कामे पूर्णत्वास नेता आली. सुंदरपूर या गावाच्या सरपंच व इतर प्रतिनिधींशी ज्या वेळी बैठक घेण्यात आली, त्या वेळी ग्रामपंचायत व सुंदरपूर शाळा या एकाच परिसरात असल्याने 'शालेय शौचालय स्वच्छता' या विषयावर सहजच चर्चा केली आणि 'शाळेचे स्वच्छतागृह हे माझ्या शिक्षकाने स्वच्छ करायचे का? की, या छोट्या लेकरांनी हातात झाडू घेऊन हे स्वच्छतागृह स्वच्छ करायचे? असे प्रश्न विचारून भावनिक आवाहन केले आणि सरपंच यांना लगेच पर्याय दिला की, तुमच्या अधीनस्त असणाऱ्या ग्रामपंचायत सफाई कर्मचाऱ्यास तुम्ही हे स्वच्छतागृह स्वच्छ करण्यास सांगावे, कारण सगळी मुले आपलीच आहेत आणि शाळासुद्धा गावचीच आहे. सरपंचांनी हे तत्काळ मान्य केले व अगदी माझ्यासमोर सफाई कर्मचाऱ्यास बोलावून, त्याला त्याप्रमाणे आदेश दिले. यानुसार आज रोजी जि.प. शाळा, सुंदरपूर व याचप्रमाणे ३६३ पटसंख्या असलेली जि.प. शाळा, निफाड नं. १ या शाळेत मा. उपनगराध्यक्ष सुनीताताई कुंदे यांच्या पुढाकाराने दोन्ही शाळांमध्ये स्वच्छतागृह साफ करण्यासाठी स्वतंत्र माणसांची नेमणूक करण्यात आलेली आहे आणि यासारख्या दुर्लक्षित प्रश्नांकडेही लक्ष वेधून शाळांचे प्रश्न सोडविण्याचे काम हाती घेतले.

शाळांमध्ये केवळ पाठ्यक्रमच न शिकवता कला, क्रीडा व संगीत यांचे शिक्षण मुलांना द्यावे यादृष्टीने सतत बोलणे सुरू होते. शनिवारच्या दिवशी अशा प्रकारचे शिक्षण देण्यासाठी गावातील शिक्षित तरुण-तरुणींचा उपयोग विनामूल्य समाजसेवा म्हणून करून घ्यावा, असे जि. प. शाळा पंचकेश्वर येथील ग्रामस्थांच्या बैठकीत सुचविले आणि त्याचा परिणाम झाला. एका ग्रामस्थाने लगेच समोर येऊन सांगितले की, माझ्या मुलीने 'कराटे'चे प्रशिक्षण घेतलेले असून ती उद्यापासून या मुलांना शिकविण्यास येईल. त्यानुसार खरोखरीच ५ फेब्रुवारीपासून जि. प. शाळा पंचकेश्वर येथे १८३ मुलांसाठी आठवड्यातून दोन दिवस कराटेचे प्रशिक्षण सुरू आहे. याच धर्तीवर निफाड नं. १ शाळेनेसुद्धा कराटे व लगोरीचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण ३६३ मुलांसाठी विनामूल्य सुरू केले आहे.

दि. २ जानेवारी रोजी शाळांमधील 'शैक्षणिक साहित्याची मांडणी आणि व्यवस्थापन' यावर केंद्रस्तरीय स्पर्धा घेतली व बीटातीलच इतर केंद्रातील शिक्षकांकडून परीक्षण करून केंद्रनिहाय बक्षिसेही देण्यात आली. यामुळे शिक्षकांचा उत्साह व आत्मविश्वास आणखीच वाढत गेला.

दि. ४ जानेवारी २०१६ रोजी जि.प.शाळा प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वरचित, स्वलिखित कवितांचा 'शब्दफुले' हा काव्यसंग्रह मा. प्रधान शिक्षण सचिव नंदकुमारसाहेब यांच्या हस्ते प्रकाशित झाला.

शिक्षक व अधिकारी यांच्यातील दरी कमी होण्यासाठी दि. ९ जानेवारी २०१६ रोजी शिक्षकांच्या

**बाहेरून शाळा-भेटींसाठी येणारे सर्व अधिकारी, पदाधिकारी, शिक्षक यांना याविषयी आज माझे शिक्षक तासन्तास भरभरून माहिती देतात आणि मुलांचे शिकणे आनंददायी होण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावेत, असा आग्रह धरतात. शाळाभेटीतील एक निवडक प्रतिक्रिया आपल्यासाठी देत आहे सलाम ताई, तुमच्या नियोजनाला! तुमच्या निफाड बीटातील ज्ञानरचनावादी शिक्षक व विद्यार्थी यांनी काल दि. ३०/०३/२०१६ रोजी आमच्या संगमनेर तालुक्यातील ५५ शिक्षकांना आपल्या बीटातील कुरूडगाव व कोठुरे फाटा या शाळांना भेट देण्याचा योग आला. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र आणि त्यातील ज्ञानरचनावाद' ही अप्रगत शाळांचा कलंक पुसणारी खरोखर एक क्रांतिकारी चळवळ असल्याचे आपण सिद्ध करून दाखविले आहे. आम्हीसुद्धा आज, आता, ताबडतोब सुरुवात करत आहोत. अडचण आल्यास फोन करू, मार्गदर्शन घेऊच. ज्ञानरचनावादाने झपाटलेला एक शिक्षक- श्री. कृष्णा मोरे, जि.प. शाळा, नान्नज दु.॥, ता. संगमनेर, जि. अहमदनगर, मोबा. ९७३०१५३६३८**

आनंदमेळाव्याचेही आयोजन बीटात करण्यात आले. त्यांच्यात उत्साह निर्माण करण्यासाठी या मेळाव्याचा उपयोग झाला. अशा रीतीने संपूर्ण बीटात एक सकारात्मक वातावरण वर्षभर निर्माण करण्यासाठी 'पीएसएम'चा खूप उपयोग झाला.

दि. १ जानेवारी २०१६ पासून निफाडमधील काही शाळा राज्यातील शिक्षकांना बघण्यासाठी खुल्या केल्या. यामुळे इतर शिक्षकांकडून आपल्या शाळेतील शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे होणारे कौतुक व मिळणारी शाबासकी याने उत्साहाला जास्तच उधाण आले. दि. १ जानेवारी २०१६ पासून आजतागायत संगमनेर, राहाता, कोपरगाव, येवला, नाशिक, मोखाडा, पालघर, जालना अशा तालुक्यांतून जवळपास दहा हजार शिक्षकांनी शाळांना भेटी दिल्या.

दि. २१-२२ मार्च २०१६ व २८-२९ मार्च २०१६ या दिवशी निफाड बीटात झालेल्या 'शिक्षणाची वारी'नेही शिक्षकांच्या केलेल्या कामाला एक नवी झळाळी मिळाली. नाशिक जिल्ह्यातील २०० नवोपक्रमशील शिक्षकांनी निफाडच्या शाळांना भेटी दिल्या आणि आपल्या शेजारच्या तालुक्यात 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या कार्यक्रमाला मिळालेले यश 'याचि देही याचि डोळा' सर्वांनी अनुभवले.

अशा रीतीने माझ्या ३९ शाळांत हे पीएसएमचे अग्रदूत आहेत, जे संपूर्ण राज्यात 'पीएसएम'चे महत्त्व पटविण्यासाठी झटत आहेत. आजपर्यंत श्रीरामपूर, मनमाड, संगमनेर अशा ७ ते ८ तालुक्यांत आम्ही 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र'च्या कार्यशाळाही घेतल्या व सर्वांना या प्रवाहात सामावून घेत आहोत. भेटी देणाऱ्या शिक्षकांना काहीही अडचण आल्यास आम्हाला फोन करा, असा सहकार्याचा हातसुद्धा माझे शिक्षक स्वत:हून प्रत्येकाला देत आहेत. हाच त्यांच्यातला मला दिसून आलेला आत्मविश्वास व त्यांनी केलेले काम ही त्याची फलश्रुती आणि हेच 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचे' यश आहे.

ज्यांचा माणसांवर विश्वास असतो, माणसांनी बनविलेल्या समाजावर विश्वास असतो; त्यांच्या संवेदनांना निमंत्रण देऊन वाट पाहण्याची गरज नसते, असे काहीसे मला माझ्या बीटात दिसले.

'हम चलते गये, कारवाँ बनता गया
क्योंकी हमे पता था,
मंजिल की तलाश न करो प्यारे
क्योंकि अच्छे लोगोंका इंतजार
तो हमेशा रास्ते भी करते है।'

'शिक्षक काम करतात, त्यांना फक्त प्रेरणा द्या,' या मा. प्रधान सचिवांच्या म्हणण्यानुसार फक्त प्रेरणा देण्याचेच काम सुरू आहे. या सर्व कार्यक्रमांतून विद्यार्थी व शाळाविकास या गोष्टी साध्य होण्यास मदत झाली आणि हे सर्व साध्य होण्यास 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रमातून वेळोवेळी मिळणारी प्रेरणाच महत्त्वपूर्ण ठरली.

**मो. ९४०४५७७९६७, ७०३८७४१९३९**

वार्षिक वर्गणी रुपये ४००/-
त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/-
किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.
'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि
दरमहा 'शिक्षणवेध'चा अंकही मिळवा.
वर्गणी/रोख/चेक/ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.
मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.

**पुणे कार्यालय :**
ग्राममंगल, गांधी भवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११०३८.
संवाद : ०२० २५३८६६८७

**अस्माकौसर व**
**राजअहमद अब्बास देसाई**
शिक्षण विस्तार अधिकारी, चिपळूण

# ज्ञानरचनावाद : एक यशस्वी प्रवास

**इरादा हो अटल तो मोअजिजा ऐसा भी होता है।**
**दिए को जिंदा रखती है हवा ऐसा भी होता है ।।**

प्रबळ इच्छाशक्ती असेल तर कोणत्याही कामात यश हे निश्‍चितच मिळणार. प्रबळ इच्छाशक्ती विचारांना मजबूत करते. मजबूत विचार कृतीमध्ये बळ निर्माण करते. बळकट कृती परिवर्तन घडवते. दिनांक २२ जून २०१५चा 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' हा कार्यक्रम मा. नंदकुमारसाहेब, प्रधान सचिव, शिक्षण विभाग यांच्या प्रबळ इच्छाशक्तीतून निर्माण झाला. यातून शिक्षण यंत्रणेतील शिक्षकापासून सचिवापर्यंत सर्वांचे विचार मजबूत झाले. कृतीला बळ आले. म्हणूनच प्राथमिक शिक्षणात गुणवत्तारूपी परिवर्तन लाट अखंड महाराष्ट्रात पाहावयास मिळत आहे. या परिवर्तनाच्या लाटेतील एक थेंबरूपी सहभाग स्वत:ला समृद्ध करणारा, आनंद देणारा व आत्मविश्‍वासाने भारलेला आहे. या सहभागाचा हा लेखाजोखा.

दि. १४ मे २०१५ हा दिवस अविस्मरणीय ठरला तो सातारा येथील राज्यस्तरीय कार्यप्रेरणा प्रशिक्षणामुळे. कुमठे बीटमधील राकुसलेवाडी शाळेला भेट दिली. तेथील विद्यार्थी-प्रगती व शिक्षक श्री. सुतारसर व सौ. हेंद्रे ताई यांच्या कामाने प्रभावित झालो. या बीटमध्ये ज्यांनी ज्ञानरचनावाद जिवंत करण्याचे काम केले, त्या श्रीम. प्रतिभा भराडे ताई यांनी तर काम करण्याची नवी दिशाच दिली. श्री. नामदेव माळी, श्रीम. तृप्ती अंधारे, श्रीम. ज्योती परिहार व श्री. बालाजी जाधव या सर्वांनी आम्हांस प्रेरणा देऊन काम करण्यास ऊर्जा, ऊर्मी दिली. तिथून परतलो ते ज्ञानरचनावाद आपल्या चिपळूणमध्ये जिवंत करण्याचे स्वप्न व गुणवत्ता-विकासाचा ध्यास घेऊनच.

**कामाचा आराखडा व नियोजन**

परतल्यानंतर लगेच कामाला सुरुवात केली. मा. सभापती, मा. उप. सभापती मा. गटविकास अधिकारी, मा. गट शिक्षणाधिकारी यांच्याशी चर्चा करून कामाचा मनोदय सांगितला. त्यांची परवानगी घेऊन पुढील कामाला गती दिली. केंद्रप्रमुख, उपक्रमशील मुख्याध्यापक व उपक्रमशील शिक्षक यांना सोबत घेऊन संपूर्ण वर्षभरात काय करावे, कसे करावे, केव्हा करावे, याबाबतचा आराखडा तयार केला. सदर आराखडा दि. ११ जून ला मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविला. मंजुरी मिळताच आराखड्याप्रमाणे कामाला सुरुवात केली. सर्वप्रथम बीटमधील सर्व मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांची बैठक घेऊन सर्वांना विश्‍वासात घेतले. ज्ञानरचनावाद व एकूण वर्षभर करावयाच्या कामाबाबत चर्चा केली. सर्वांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हे कामाच्या यशाचे प्रतिबिंबच होते.

**कुमठे बीट अभ्यास दौरा**

दि. २६ जून २०१५ रोजी आम्ही दोन विस्तार अधिकारी असधि फुरुस, वहाळ, कापरे बीटमधील १५१ शिक्षकांना घेऊन कुमठे बीटला भेट दिली. कुमठे बीटातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून आमचे सर्व शिक्षक अचंबित झाले. १००% मुले शिकू शकतात, ही अशक्य वाटणारी बाब कुमठेमध्ये प्रत्यक्षात पाहावयास मिळत होती.



आमच्यामध्ये विश्वास निर्माण होत होता. आम्हीही हे करू शकू, अशी इच्छा दाटून येत होती. मुलांचा विश्वास, अभिव्यक्ती, निर्भीडपणा, अध्ययनातील उत्साह अशा अनेक गोष्टी वेचून ज्ञानरचनावादाचा कलश घेऊन परतलो. जाता-येता प्रवासामध्ये ज्ञानरचनावादाच्या चर्चा आनंदात, उत्साहात झडत होत्या. आम्ही काय पाहिले व तुम्ही काय पाहिले, अशी विचारांची देवाण-घेवाण सुरू होती. सर्व प्रभावित झाले होते. आम्हीही ज्ञानरचनावादाच्या कामाला सुरुवात करू, हा आत्मविश्वास व निर्धार करून सर्व जण परतलो.

**ज्ञानरचनावादी कार्यशाळा**

ज्ञानरचनावादाप्रमाणे, काही शाळांमधून रंगरंगोटी, फरशीवरील रचना व अल्प प्रमाणात अध्ययनसाहित्य जमा करून कामाला सुरुवात झाली. पण काही जण अजून संभ्रमात होते. नेमकी कशी सुरुवात करावी, कोठून सुरुवात करावी, भाषा-गणितचे अध्ययनाचे टप्पे कसे असावेत- याबाबत व्हॉट्सॲपच्या माध्यमातून चर्चा सुरू झाली. ज्ञानरचनावाद खोलात जाऊन समजून घेणे आवश्यक होते. त्यासाठी दि. २ व ३ ऑगस्ट रोजी मा. नामदेव माळी व श्रीम. प्रतिभा भराडे यांच्या 'ज्ञानरचनावादी कार्यशाळा'चे आयोजन केले. यामध्ये ज्ञानरचनावाद व मूल समजून घेण्याचा राजमार्ग खऱ्या अर्थाने सापडला. कार्यशाळेस ज्ञानरचनावाद वर्गात जिवंत कसा असावा; मूल समजून घेणे, मेंदू अभ्यास, अध्ययनाचे शास्त्र, गणित व भाषा शिकण्याचे टप्पे- अशा विविध बाबी स्पष्ट झाल्या. ज्ञानरचनावादामध्ये कृतीचे महत्त्व, अध्ययनसाहित्याची गरज व रचनांची मदत अशा विविधांगी विषयावर शिक्षकांमध्ये चर्चा झाली. चर्चेतून समस्या सोडविण्यास मदत झाली.

आता यापुढे कामाला खरी गती आली. ज्ञानरचनावादानुसार मुले अधिक आनंदाने शिकू लागली. शिकण्याची गती वाढत होती. शिकण्याची गती पाहून शिक्षकही आनंदित होत होते. आता आमच्या शाळा १००% ज्ञानरचनावादी झाल्या होत्या. मूल, शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व स्वत: आम्ही सर्व जण आनंदात होतो.

**भूमिकेतील बदल**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम येण्यापूर्वीपासून आमचे शिक्षक उत्तम काम करतच आहेत, पण या कामाची दाद घेतली जात नव्हती. पर्यवेक्षण अधिकारी म्हणून शाळाभेटीत शिक्षकांनी काय चांगले केले आहे यापेक्षा काय केले नाही, यावरच अधिक भर असायचा. शाळाभेट जणू काही उणिवा शोधण्यासाठीच आहे, असा आमचाही समज होता. मात्र प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमातून पर्यवेक्षण यंत्रणेची भूमिका खऱ्या अर्थाने समुपदेशक, मदत, मेंन्टॉर व सुलभकाची आहे, ही



जाणीव पहिल्यांदा झाली. त्याप्रमाणे नियमितच्या भूमिकेत बदल करून शाळाभेटीत शिक्षकांशी अधिक जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. शिक्षक मित्र झाले. संवाद करू लागले. चर्चा करू लागले. आपल्या समस्या-अडचणी बिनधास्त मांडू लागले. यातूनच बीटस्तरावर एकत्र येणे व एकमेकांना साह्य करणे, मदत करणे असे शैक्षणिक वातावरण तयार झाले.

**एम. ओ. टी.ची मदत**

काम करत असताना अडचणी येणार, समस्या निर्माण होणार. सुरुवातीला काम समजून घेण्यात अनेकांना समस्या आल्या. या समस्यांतून कामाची गतीही मंदावली. पण या समस्यांना संयमाने सामोरे जाण्याचे कौशल्य एम. ओ. टी. प्रशिक्षणातून प्राप्त झाले. एम. ओ. टी.मध्ये वारंवार भेट देऊन मा. नंदकुमारसाहेब, प्रधान सचिव, शिक्षण विभाग यांनी दिलेली प्रेरणा, प्रशिक्षक म्हणून काम करताना आवश्यक असणारे कौशल्य याबाबतचे साहेबांचे मार्गदर्शन पाठीशी होते. श्री. श्यामसर, श्री. असिफसर व श्री. जितेंद्रसर या त्रिमूर्तीने जीवनाकडे बघण्यासाठी दिलेली दृष्टी आणि कोणतीही समस्या निवाकरण करण्याची शास्त्रीय पद्धत उपयोगी पडत होती. आलेल्या सर्व समस्यांना, आघातांना शांतपणे सामोर जाऊन कामाचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न केला. कामातील समृद्धता, मुलांना अध्ययनात मिळणारे यश आता सर्वांना दिसू लागले. सर्व जणच आता काम समजून घेण्यास आवडीने पुढे येऊ लागले. काम समजत गेल्याने काहींच्या मनात असणाऱ्या समस्याही दूर होत गेल्या.

रख हौंसला वो मंजर भी आयेगा,<br>
प्यासे के पास चल कर समंदर भी आयेगा।<br>
थक कर ना बैठ, ऐ मंजिल के मुसाफिर,<br>
मंजिल भी मिलेगी और जीने का मजा भी आयेगा ।

**खंबीर साथ**

काम करत असताना यश-अपयशाचे अनेक प्रसंग येत गेले. प्रत्येक प्रसंगात खंबीर साथ मिळाली ते आमचे मार्गदर्शक मा. एकनाथ आंबोकरसाहेब, शिक्षणाधिकारी प्राथमिक यांची. सदैव संधी देऊन पुढे जाण्यासाठी त्यांनी नेहमीच प्रेरित केले. मा. विलास चाळके- सभापती शिक्षण व अर्थ समिती, मा. स्नेहा मेस्त्री- सभापती पंचायत समिती चिपळूण यांनी या कामास पाठिंबा दिला. त्यांनी स्वत: वेळ देऊन अनेक शाळांना भेटी दिल्या. शिक्षक करत असलेल्या कामाचे कौतुक केले. आवश्यक ती मदतही केली. डायटचे प्राचार्य मा. डॉ. शेखसाहेब, डायटची टीम, आमचे गट-शिक्षणाधिकारी, सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व साधनव्यक्ती या सर्वांची अनेक प्रसंगी साथ मिळाली व योग्य ते मार्गदर्शनही लाभले. दरम्यानच्या काळात जानेवारीमध्ये महाड येथे कोकण विभागाची 'शिक्षण परिषद' मा. ना. विनोदजी तावडेसाहेब, शिक्षणमंत्री महाराष्ट्र शासन व मा. नंदकुमारसाहेब यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. याही ठिकाणी प्रगत बीटचे सादरीकरण करण्याची संधी आम्हाला मिळाली. सर्वजण आमच्या ज्ञानरचनावादी कामाने खूश झाले. आता आम्ही सर्वजण अधिक जोमाने, उत्साहाने प्रेरित होऊन काम करू लागलो. शिक्षकापासून वरिष्ठापर्यंत काम करणाऱ्यांची एक सुलभ

साखळी निर्माण झाली. प्रत्येकाचा एकच ध्यास... माझी शाळा, केंद्र, बीट प्रगत झाले पाहिजे. प्रत्येक जण विद्यार्थी प्रगत होण्यासाठी काम करू लागले. यश मिळत गेले. आनंद वाढत गेला. काम अधिक दर्जेदार होण्यासाठी धडपडही अधिक वाढत गेली.

ज्ञानरचनावाद वर्गात जिवंत करून खऱ्या अर्थाने विद्यार्थ्याला ज्ञाननिर्माता घडविण्यापर्यंतचा खडतर प्रवास यशस्वीपणे पूर्ण करण्याचे संपूर्ण श्रेय आमच्या शिक्षकांना जाते. या कामाला खंबीर साथ मिळाली ती आमच्या शिक्षकांची, म्हणूनच या यशाचे खरे मानकरी आमचे कार्यप्रवीण व उपक्रमशील शिक्षक आहेत. या शिक्षकांच्या कार्याला आमचा मानाचा मुजरा!

**मुले शिकत आहेत...**

आज आमच्या प्रत्येक शाळेत सर्व मुले अधिक आनंदाने शिकत आहेत. खडे, माती, मणी, चिंचोके, बिया, काड्या, अंगकार्ड, अक्षरकार्ड, शब्दकार्ड, शब्द-पट्ट्या अशा नाना विविध प्रकारचे अध्ययनसाहित्य मुले हाताळत आहेत. साहित्याद्वारे कृतीतून स्वत:च्या ज्ञानाची निर्मिती करत आहेत. स्वत:च अध्ययन करण्याचे कौशल्य प्राप्त करत आहेत. बालसभा, चर्चा, संवाद, नाट्यीकरण, मुलाखत यांसारख्या विषयात तसेच भाषण, संभाषण, निबंधलेखन, कवितालेखन, संख्याज्ञान अशा एकाच वेळी अनेक क्रिया करण्याचे विविधांगी अध्ययनाचे अनुभव मुले स्वत: घेत आहेत. आता शाळा-शाळांमधून ज्ञानरचनावाद जिवंत झाला आहे. खऱ्या अर्थाने आमच्या शाळाही आता अधिक जिवंत व समृद्ध वाटत आहेत.

मुलांचे शिकणे आता वाचन, लेखन व गणिती क्रिया यांपुरते मर्यादित न राहता त्याही पलीकडे गेले आहे. मुले आता स्वत: अभिव्यक्त होत आहेत. निर्भीडपणे शाळा व परिसरात वावरत आहेत, बोलत आहेत. आपल्या समस्या मांडत आहेत व सोडवतही आहेत. त्यांच्यातील आत्मविश्वास ओथंबून वाहत आहे. स्वत: निर्णय घेत आहेत. एकमेकांना मदत करून सोबत घेऊन पुढे जाण्यासही सज्ज आहेत. जगण्याची नवी उमेद या ज्ञानरचनावादाने आमच्या मुलांमध्ये निर्माण झाली आहे.

**आम्ही समृद्ध होत आहोत...**

आमच्या मुलांची प्रगती शिक्षकासह आम्हा सर्वांना अधिक समृद्ध करत आहे. या कामामुळे आज आमचे तीन बीट- फुरूस, वहाळ व कापरे- शैक्षणिक पर्यटनस्थळ झाले आहेत. सिंधुदुर्गपासून ठाणेपर्यंतचे हजारो शिक्षक आता आमच्या शाळा पाहण्यास येत आहेत. या अभ्यास दौऱ्यातून येणारे काय घेऊन जातात, हा त्यांचा विचार. मात्र यातून आम्ही अधिक समृद्ध होत आहोत, हे निश्चितच. आमच्या शिक्षकांनी डायटच्या मार्गदर्शनानुसार व मदतीने ज्ञानरचनावाद भाषा व गणित विषयासाठी मार्गदर्शक पुस्तिका तयार केली. जिल्ह्यात अनेक ठिकाणी आमचे शिक्षक ज्ञानरचनावादाची कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन करत आहेत. शासनामार्फत आयोजित करण्यात आलेल्या शिक्षकांसाठीचा अभ्यास दौरा 'शिक्षणाची वारी' यामध्ये सहभागी होण्याचा मान आम्हाला मिळाला. ठाणे, रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातून ६०० उपक्रमशील शिक्षक शिक्षणाच्या वारीत सहभागी झाले. त्यांच्याशी चर्चा, संवाद व आंतरक्रिया करून आमची मुले, शिक्षक व आम्ही अधिक समृद्ध झालो.

खऱ्या अर्थाने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राने विद्यार्थी गुणवत्तेची हाक दिली. महाराष्ट्रातील तमाम शिक्षक-बांधवांनी या हाकेला साद दिली. महाराष्ट्रात विद्यार्थी गुणवत्तेची चळवळ सुरू झाली. प्रत्येक जण ज्ञानरचनावाद ABL, ISO, डिजिटल, E-learning अशा विविध मार्गांनी प्रयत्न करून विद्यार्थी-विकासासाठी झटत आहे. मा. नंदकुमारसाहेबांनी टाकलेला प्रत्येक शिक्षकांवरील विश्वास हा या कार्यक्रमातील आत्मा आहे. तो जिवंत राहावा, यासाठी प्रत्येक जण शिक्षकापासून वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत प्रयत्न करत आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या या पहिल्या टप्प्यात आपणास अनेकांना यश प्राप्त झाले. यावर समाधान मानून चालणार नाही. अजून आपल्याला यशाची अनेक शिखरे काबीज करत गुणवत्ताविकासाचा उच्चांक गाठायचा आहे. चला तर- येत्या शैक्षणिक वर्षात अधिक जोमाने काम करून १००% प्रगत महाराष्ट्राचे स्वप्न साकार करू, चला तर घेऊ झेप उंच आकाशी...

मंजिले उन्हींको मिलती है जिनके सपनोंमे जान होती है।
पंखोंसे कुछ नहीं होता हौसलोंसे उडान होती है ॥

**मो. ९४०४९९२७५५, ९४०४९९४१९९**

**कैलास लोखंडे**
शिक्षण विस्तार अधिकारी, नागपूर

# प्रगतचा प्रवास ...

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या दूरदर्शी उपक्रमांतर्गत पर्यवेक्षीय यंत्रणेमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक घटकाला काम करण्याची नवी ऊर्जा मिळावी, याकरिता सातारा येथे कार्यप्रेरणा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मी या प्रशिक्षणाला मे महिन्यात उपस्थित झालो व कुमठे बीट येथील शाळांना भेटी देऊन 'प्रत्येक मूल शिकू शकते' याची प्रचिती आली. तेव्हा 'आपल्या शाळेतील, बीटातील व तालुक्यातील प्रत्येक मूल का शिकू शकत नाही?' हा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आपल्या तालुक्यामध्ये मी रचनावाद रुजविण्याचा संकल्प केला.

कुमठे बीटातील शाळाभेट माझ्यासाठी प्रेरणादायी ठरली. तत्पूर्वी, माझ्या कामामध्ये यांत्रिकपणा होता. शाळाभेटीमध्ये शिक्षकांचे टाचण, त्यांचे नियोजन (वार्षिक) तसेच वर्गातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता (शिक्षकनिर्मित) हे तपासण्यावर भर होता. तसेच शिक्षकांच्या चुका शोधण्यात धन्यता, अधिकारी असल्याचा आनंद वाटत होता. यात कुठे काही उणिवा आढळल्यास शिक्षकांना रागवण्यात आनंद मिळत होता. त्यामुळे शिक्षक मला 'हिटलर' असे संबोधायचे. हिटलरशाहीमुळे अधिकारपणाची दहशत शिक्षकांमध्ये निर्माण केली, परंतु त्यांना उत्तम अध्यानाकरिता प्रेरणा देऊ शकलो नाही. ही प्रेरणा देण्यासाठी मला कुमठे बीटाने प्रेरित केले.

मी कुमठेहून परत आल्यानंतर लगेच जून २०१५ मध्ये तालुक्यातील २५ उपक्रमशील शिक्षकांची सभा घेतली व तालुका अप्रगत विद्यार्थिमुक्त करण्याबाबत त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. त्याचबरोबर भाषा व गणित विषयात अप्रगत असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रगत करण्याच्या दृष्टीने घटक-नियोजन करून शिक्षकांच्या कार्यशाळेचे नियोजन केले. त्यानंतर दिनांक २१ व २२ जुलै २०१५ ला तालुक्यातील ४०० शिक्षकांच्या कार्यप्रेरणा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यात उपक्रमशील शिक्षकांनी भाषा व गणित या विषयावर मार्गदर्शन केले आणि तेथूनच शिक्षकांना प्रेरणा मिळाली, त्यांच्या कार्यप्रवणास सुरुवात झाली. परंतु त्यांच्या प्रवासाची गती फार मंद होती. ईप्सित ध्येयाप्रतीची वाटचाल फार मंदगतीने होत होती. तेव्हा मा. नंदकुमारसाहेबांनी ताडाळी बीट, चंद्रपूर येथील रचनावादी शाळांना भेटी द्या, अशी सूचना केली.

मा. नंदकुमारसाहेब यांच्याशी संवाद साधल्यानंतर लगेच २६ तारखेला शिक्षकांशी संवाद साधला व त्या सायंकाळपर्यंत ११६ शिक्षकांनी ताडाळी येथे जाण्यास तयारी दर्शविली. चंद्रपूर येथील रचनावादी शाळा बघितल्या आणि तिथून परत आल्यानंतर आमच्यातील काही शिक्षकांनी कुमठे येथे जाण्याची इच्छा व्यक्त केली. कुमठे येथे जाण्यास पाच शिक्षक तयार झाले. तेव्हा मी त्यांना पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यांचे तिकीट तसेच त्यांच्या सर्व खर्चाची जबाबदारी मी घेतली. दि. ३० नोव्हेंबर २०१५ ला नागपूरहून पाच शिक्षक कुमठे येथे रवाना झाले. कुमठे बीट, सातारा येथे गेलेल्या चमूने तेथे भाषा, गणित विषयाची अध्ययन-अध्यापन प्रक्रिया



समजून घेतली. शैक्षणिक साहित्याचा अध्यापनातील वापर याची माहिती जाणून घेतली. तसेच, त्यांच्या शंकांचे समाधान भराडे ताई यांनी केले व स्वत: आमच्या चमूसोबत त्या राहिल्या. दि. ३ डिसेंबर २०१५ ला आमचा चमू नागपूरकडे रवाना झाला. त्यानंतर श्रीमती कल्पना बन्सोड ताई, जि.प. चंद्रपूर यांनी चनकापूर शाळेला भेट दिली आणि तेथील सर्व शिक्षकांना भाषा व गणित विषयाच्या अध्यापनाबाबत मार्गदर्शन केले व पुढील कार्यशाळेचे नियोजन केले.

दि. ७ व ८ डिसेंबर २०१५ ला सॅक्रेट हार्ट अकॅडमी येथे कार्यशाळेचे आयोजन केले. हे दोन्ही दिवस बन्सोड ताई यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यामुळे शिक्षकांतील आत्मविश्वास वाढण्यास फारच मदत झाली. त्या दोन दिवसीय कार्यशाळेमधून शिक्षकांमध्ये नवे चैतन्य, उत्साह, ऊर्जा निर्माण झाली. कार्यशाळेनंतर लगेचच बीटातील सर्व शिक्षक (५८) शाळेतील रंगरंगोटी व साहित्यनिर्मिती करावयास लागले. सर्व शाळेत आनंदी वातावरण निर्माण होऊ लागले. शिक्षक स्वत:हून आपल्याजवळील पैसे खर्च करून स्वत: रंगरंगोटी व शैक्षणिक साहित्यनिर्मिती करू लागले. असे आनंदी वातावरण यापूर्वी कधीच बघितले नव्हते. मी व माझ्या शिक्षकातील अंतर शून्यावर आले आहे. सोबतच आमचे नाते मैत्रीचे झाले आहे. मी त्यांना 'मित्रा' म्हणून संबोधतो; तेव्हा ते दबक्या आवाजात आपापसात चर्चा करतात की, पूर्वीचा 'हिटलर' आता दिसत नसून आमचा मित्र, सहकारी आम्हाला दिसतोय. त्यांच्याशी बोलताना, चर्चा करताना ते कधीही संकोच करीत नाहीत.

रचनावादी काम प्रत्येक शाळेत उभे राहिल्यानंतर शैक्षणिक साहित्यनिर्मितीची बीटातील शिक्षकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यात जवळपास २१५ शिक्षकांनी भाग घेतला व साहित्य निर्माण केले. त्याचा अध्यापनात फारच उपयोग होऊ लागला. बीटातील शिक्षकांना त्यांच्या कामाचे इतरांसमोर सादरीकरण करता यावे, म्हणून तालुकास्तरावर शिक्षण परिषदेचे आयोजन केले. त्यात शाळेतील सर्वच शिक्षकांना आपले अनुभव मांडण्याची संधी देण्यात आली. त्या परिषदेमधून त्यांच्यातील आत्मविश्वास अधिकच वाढीस लागला व ते फार जोमाने कामास लागले. त्यानंतर वर्ग पहिलीच्या शिक्षकांची कार्यशाळा लावली. मार्च महिन्यात वर्ग पहिलीमध्ये विद्यार्थी दाखल करण्यात आले व त्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यात त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यात रचनावादी कार्य सुरू झाल्यानंतर शिक्षकांना काही अडचणी येऊ लागल्या. शाळाभेटीला गेल्यानंतर समस्या दिसायला लागल्या. त्या समस्या सोडविण्यासाठी मला 'मूल कसं शिकतं' तसेच रचनावादी प्रक्रिया समजावून घेणे आवश्यक वाटले. म्हणून जानेवारी २०१६ ला कुमठे बीटला भेट देण्याचे नियोजन केले. कुमठेतील शाळांना

भेटी देऊन ज्ञानरचनावादी प्रक्रिया समजावून घेतली व भराडे ताईंशी चर्चा करून मनातील शंकांचे समाधान करून घेतले.

रचनावादामागची शास्त्रीय बैठक समजावी म्हणून 'मेंदू व रचनावाद' या विषयावर कार्यशाळा घेतली. मेंदू व रचनावाद या विषयावर मार्गदर्शन करण्याकरिता श्रीमती कल्पना बन्सोड ताई यांना बोलविण्यात आले. त्यात त्यांनी मेंदूचे वेगवेगळे घटक, मेंदूचे प्रकार, त्यांचे कार्य, मूल समजून घेताना- अशा एक ना अनेक बाबी दृक्श्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित ४२५ शिक्षकांना समजावून सांगितल्या. उल्लेखनीय बाब अशी की, एप्रिल महिन्यात कार्यशाळा होती व कार्यशाळेदरम्यान विद्युतपुरवठा खंडित झाल्यानंतरही सर्व जण आपल्याच जागेवर बसून कल्पनाताईंचे भाषण एकाग्रतेने ऐकत होते. ही कार्यशाळा अतिशय उपयुक्त झाली. ज्ञानरचनावादाचे शास्त्र समजले; रचनावादच का, याचे उत्तर मिळाले.





एकंदरीत आज माझ्या बीटातील सद्य:स्थितीत बहुतांशी शाळा प्रगत झाल्या असून उर्वरित शाळा प्रगत होण्याच्या मार्गावर आहेत. रचनावादामुळे प्रत्येक मूल शिकू शकतं, असा माझा ठाम विश्वास आहे आणि माझ्या शिक्षक मित्रांतसुद्धा तोच विश्वास निर्माण झालेला आहे. वर्तनवादापेक्षा रचनावाद श्रेष्ठ आहे, हे मला व माझ्या मित्रांना उमगले आहे.

या संपूर्ण कार्याकरिता मला मा. नंदकुमारसाहेब, प्रधान सचिव, प्रतिभाताई भराडे ताई, आमचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, गट-शिक्षणाधिकारी यांची मदत झाली. शाळा आणि शाळेतील मुले घडविण्यासाठी सर्वांत मोठा सिंहाचा वाटा माझ्या शिक्षक मित्रांचा आहे. त्यामुळे शाळा प्रगत करण्याचे सारे श्रेय मी बीटातील सर्व शिक्षकांना देतो. प्रगत महाराष्ट्र करण्यासाठी माझा व माझ्या शिक्षकांचा त्यात खारीचा वाटा नक्कीच राहील.

**मो.९८२३८०८६०२**

**प्रवीणकुमार श्रीराम काळम**
शिक्षण विस्तार अधिकारी, गेवराई



# बीट प्रगत करताना...

दुष्काळाच्या झळा सहन करणाऱ्या बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात गेल्या बारा वर्षांपासून शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळत आहे. ४५ शाळा, माझे शिक्षक आणि आमचे शैक्षणिक उपक्रम पुढे घेऊन जाताना माझे सहकारी व वरिष्ठ यांचे पाठबळ मिळाले. आवडीचे काम करायची संधी नेहमीच मिळाली. बीटमधील ३७ शाळांना लोकसहभागातून संगणक उपलब्धतेसाठी प्रयत्न करता आले. २५ शाळांमधून सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू केले. प्राथमिक शाळेची जिल्ह्यातील पहिली वेबसाईट माझ्या शाळेत सुरू होऊ शकली. गुळज केंद्रातील शिक्षकांच्या रु. ६० हजार रुपयांच्या योगदानातून २६ हजार विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेतून खेळाचा आनंद मिळवून देता आला. (या क्रीडा स्पर्धेची भारताच्या महिला कबड्डी संघाच्या कर्णधार श्रीम. अभिलाषा म्हात्रे यांनी आवर्जून दखल घेऊन शुभेच्छा दिल्या.) शाळामूल्यांकनामध्ये जिल्ह्यातील पहिल्या तीन शाळांमध्ये माझी शाळा असणे, कब-बुलबुल, स्काऊट गाईड चळवळ वाढवून तालुक्याचा स्वतंत्र मेळावा घेणे, १६ हजार विद्यार्थ्यांना ड्रॉइंग पेपर व रंगपेटी देऊन त्यांच्या चित्रकृतींतून त्यांच्या हाती रंगांचे इंद्रधनुष्य देणे, दर वर्षी शाळांना पाच रोपे देणे व २० हजार रोपांची रोपवाटिका तयार करणे- अशा विविध कामांचा आनंद आम्ही घेत असू व समाधान मानत असू.

दि. १ व २ मे २०१५ रोजी सातारा येथे कार्यप्रेरणा प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्याची संधी मला मिळाली. मा. नंदकुमारसाहेब, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या कल्पनेतून आयोजित केलेल्या या प्रशिक्षणाचा सकारात्मक व दीर्घकालीन परिणाम प्रशिक्षणार्थ्यांवर होण्याइतपत ते प्रभावी व वास्तव स्वरूपात मांडले गेले. आदरणीय नामदेव माळी सर, श्रीम. प्रतिभा भराडे ताई, श्रीम. तृप्ती अंधारे ताई, श्रीम. ज्योती परिहार ताई, श्री. बालाजी जाधव हे सर्व मार्गदर्शक माझ्या अंत:करणाला साद घालण्यात यशस्वी झाले. माझ्या मनात घोंगावणारे विचार व कल्पनांना व्यक्त होण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. मी त्या प्रत्येकामध्ये मला व माझ्या कामाला शोधायला लागलो. कुमठे बीटची शाळाभेट अत्यंत संस्मरणीय झाली. मी माझे मूल्यमापन करतच होतो. खरेच, आम्ही किती साध्या, सोप्या व छोट्या कामात आनंद मानत होतो; आमच्या समाधानाच्या कक्षा किती मर्यादित होत्या, याची जाणीव झाली. कारण भराडे ताईंची कुमठे बीटची तपश्चर्या, मिरजेची माळीसरांची गतीने होत असलेली वाटचाल, पुरंदरच्या परिहार ताईंच्या थक्क करणाऱ्या आय.एस.ओ. शाळा, बीड व उस्मानाबादमधील अंधारे ताईंचे आत्मनिर्भरतेचे

अभियान, बालाजी जाधवांची अध्ययन-अध्यापनात तंत्रज्ञानाच्या वापरासाठीची धडपड... सर्वच थक्क करणारे! आम्ही त्या दृष्टीने कधी विचार करू शकलो नव्हतो. उद्याच्या जगात आपल्या विद्यार्थ्यांना दमदार पाऊल टाकता यावे, त्यांचे तारांगण फुलवावे, यासाठी त्यांच्या पाठीशी अनमोल अनुभवाची शिदोरी देण्याचा या सर्वांचा प्रयत्न मला अंतर्मुख करतो.

कुमठे बीटच्या शाळाभेटीने १०० टक्के मुले शिकू शकतात, हा आत्मविश्वास मिळाला. माझ्या कामाचा प्राधान्यक्रम बदलला व कामाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही! मी झपाटल्यासारखा विचार करू लागलो, पण ते पुरेसे नव्हते. माझ्या शिक्षकांसमोर हे सर्व मी जुलै, ऑगस्ट, २०१५ मध्ये मांडले. आम्ही परस्परांचा विश्वास प्रयत्नपूर्वक जपलेला आहे. म्हणूनच वर उल्लेख केलेल्या कामात खूप चांगला प्रतिसाद व सहभाग माझ्या शिक्षकांनी दिलेला होता. यामुळेच माझ्या अपेक्षाही वाढलेल्या होत्या. कुमठे बीटच्या शाळा पाहिल्यानंतर सकारात्मक परिणाम होतो आणि कार्यप्रवणतेकडे वाटचाल नक्की सुरू होते, हा विश्वास मला कार्यप्रेरणा प्रशिक्षणावेळी प्राथमिक शाळा कुमठे येथील विद्यार्थी व श्रीम. निंबाळकर ताई यांनी दिला होता. म्हणूनच १० शाळांच्या १३ शिक्षकांसह कुमठे बीटच्या शाळा भेटीला निघालो. चांभळी, दौंडज, मांडकी या पुरंदरच्या देखण्या आय.एस.ओ. शाळा पाहिल्या; तर दुसऱ्या दिवशी कुमठेची मानेवाडी ही शाळा पाहण्याची संधी मिळाली. एक वर्गखोली-दोन शिक्षिका-तेवीस विद्यार्थी आणि आम्ही तेरा जण- सकाळी १०.०० ते दुपारी ४.३० ची वेळ... समर्पणाने ओतप्रोत भरलेल्या शिक्षकांची शाळा... आनंदी मुलांची शाळा... समाधानी पालकांची शाळा- सर्वच अवर्णनीय! माझ्या जीवनातील तो एक अविस्मरणीय दिवस होता, ज्या दिवशी आमच्या अंत:करणाच्या गाभाऱ्यात सद्सदविवेकाची ज्योत तेथील विद्यार्थी व श्रीम. गायकवाड आणि गाढवे ताईंनी प्रज्ज्वलित केली. वर्गातील विविध आंतरक्रिया, विद्यार्थी-शिक्षकांच्या वर्तनातील सहजता, शैक्षणिक साहित्याचे स्थान हा सर्व अनुभव आम्ही सर्वांनी गाठीशी बांधला.

परतीच्या सात-आठ तासांच्या प्रवासात माझे शिक्षक माझ्यापेक्षा अधिक भरभरून बोलत होते, जे मला अपेक्षित होते. मला खूप बरे वाटले. जे मला कधी तोंडी सांगता आले नसते, ते या दोन्ही शिक्षिकांनी मात्र कृतीतून साधले होते. यासाठीच दोघींचे मनोमन आभार मानून कामाला लागलो. बीटमध्ये शैक्षणिक साहित्य निर्मितीची कार्यशाळा घेण्यात आली. या १३ शिक्षकांना परस्परांच्या शाळा पाहण्याची संधी दिली. राक्षसभुवन शाळेला दुपारच्या वेळी भेट दिली असता, निकाळजे सर व त्यांचे सहकारी फरशी रंगकाम करताना दिसले. शिक्षकांची फरशीशी होत असलेली मैत्री समाधान देत होती. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्सुकता दिसत होती. हळूहळू १० शाळांवर ज्ञानरचनावाद रांगू लागला. विद्यार्थ्यांना वर्गरचना व शिक्षकांमध्ये झालेला बदल आवडू लागला.

दि. ८ ऑक्टोबरला मा. सचिवसाहेब बीड येथे आले. पायाभूत चाचणी नुकतीच झाली होती. ज्ञान-रचनावाद सुरू असलेल्या १० पैकी २ शाळा अप्रगत विद्यार्थिविहीन झाल्या आहेत, असे मी सांगितले. तोपर्यंत कुमठेला जाणारा बीडमधून मी एकटाच होतो. साहेबांनी समाधान व्यक्त करून प्रोत्साहन दिले. कुमठे शाळाभेटीवेळी भराडे ताई म्हणाल्या होत्या, ''बीडहून आलात म्हटल्यावर साहेबांना खूप आनंद होईल. साहेबांचे बीडवर विशेष लक्ष आहे.'' दोन शाळांनी इतर शाळांना आत्मविश्वास मिळवून दिला होता. या दोन शाळांचे यश केंद्र संमेलनामधून ४०० शिक्षकांसमोर मांडले आणि पुढच्या टप्प्यात ३ नोव्हेंबरला ५१ शाळांचे ९७ शिक्षक व ३ केंद्रप्रमुखांसह तिसऱ्यांदा कुमठेला गेलो. भराडे ताईंनी शाळेचे नियोजन दिले. सोनगावच्या शाळेत सर्वांना मार्गदर्शन केले. बीटच्या कामाची चौकशी केली आणि काही मार्गदर्शनपर सूचना केल्या

व शुभेच्छा दिल्या. परत येताना पुन्हा आतकरवाडी व मांडकीची शाळा पाहिली. परिहार ताई व लोंढेसाहेब यांनी मार्गदर्शक म्हणून नंदकुमार चव्हाण सरांना सोबत दिले होते. मांडकी शाळेचा आय.एस.ओ. प्रवास थक्क करणारा होता. रात्री ७.३० ला मांडकी सोडली, ते गेवराईला वापस येण्यासाठी.

पण मनात एक सल होता, माझ्या जिल्ह्यात जरेवाडी ही एकच आय.एस.ओ. शाळा आहे. माझ्या तालुक्यात, बीटमध्ये एकही आय.एस.ओ. शाळा नाही. मग यासाठीच काम करायचे ठरवले. दिवाळीची सुट्टी आय. एस. ओ. साठी! परिहार ताई, लोंढेसाहेब, चव्हाणसर यांचे मार्गदर्शन मिळत होते. सीईओ मा. नन्नवरेसाहेब, शिक्षणाधिकारी मा. हिगोणीकरसाहेब, मा. जैस्वाल साहेब, मा. सारूकसाहेब, मा. कराडसाहेब, माझे गट शिक्षण अधिकारी श्री. मसरेसाहेब यांनी प्रोत्साहन दिले. २३ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या तेरा दिवसांच्या कालावधीत राक्षसभुवन शाळेची आय.एस.ओ.ची तयारी केली. आज माझ्या राक्षसभुवन, पांचाळेश्वर, गुंतेगाव या तीन शाळा; तर तालुक्यातील जोडवाडी, तरटेवाडी या दोन शाळा आय.एस.ओ. मानांकित आहेत. यासाठी ग्रामस्थांनी केलेली प्रचंड मदत व उपसलेले कष्ट आम्हा सर्वांना प्रेरणा देणारे होते. पूर्वीच्या १० शाळांनी ५१ शाळांना आत्मविश्वास दिला. आता ६१शाळांत ज्ञानरचनावाद सुरू झाला होता. बीटबाहेरील शाळेमध्येसुद्धा कामाला सुरुवात झाली आहे, याचे समाधान आहे. धारूर, शिरूर, बीड या तालुक्यात आम्ही कार्यशाळा घेतल्या. उर्दू शिक्षकांचीही जिल्हास्तरीय कार्यशाळा झाली. शिक्षकांची उत्सुकता आता वाढली होती. 'आहे रे' गट वाढत होता. भराडे ताई व माळी सर यांनी सांगली येथे सादरीकरणाची संधी दिली. तेथील राज्यस्तरीय चर्चासत्रात माझ्या शिक्षकांचे काम सहाशे अधिकाऱ्यांसमोर मांडताना मात्र मला शिक्षकांचा विनम्र अभिमान वाटत होता. वाशिमच्या राज्यस्तरीय चर्चासत्रात सादरीकरण करण्याची संधी माझ्या शिक्षकांच्या कामामुळेच मला देण्यात आली. माझे गट शिक्षण अधिकारी, सहकारी शिक्षण विस्तार अधिकारी व १२५ शिक्षक यांच्यासमवेत कुमठे बीट शाळाभेटीला चौथ्यांदा गेलो. कुमठेच्या शाळाभेटीची भूक प्रत्येक वेळी वाढत होती. प्रत्येक वेळी नवे शिकायला मिळत

वार्षिक वर्गणी रुपये ४००/- (पोस्टेज खर्च रु. ५० अतिरिक्त)

त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/-

किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.

'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि

दरमहा 'शिक्षणवेध'चा अंकही मिळवा.

वर्गणी/रोख/चेक/ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.

मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.

**पुणे कार्यालय :**

ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड,

पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७



होते.

आज तालुक्यात २५५ शाळांमधून ज्ञानरचनावाद पद्धतीने अध्ययन-अध्यापन चालते. ९० पेक्षा अधिक शाळा अप्रगत विद्यार्थिविहीन आहेत. २२ शाळांना इ-लर्निंगच्या सुविधा आहेत. माझ्या बीटमध्ये गेल्या ११ वर्षांत मला ३२ लाखांचा लोकवाटा मिळवता आला होता (वर्षाला सरासरी तीन लाख), पण या १० महिन्यांतच माझ्या बीटमध्ये ८० लाखांचा लोकसहभाग मिळवण्यात माझ्या शिक्षकांना यश आले आहे. दुष्काळाचा राक्षस खदाखदा हसत आसतानाही तालुक्यात १ कोटी ९ लाख रुपयांच्या लोकसहभागातून शाळा समृद्ध होत आहेत. (लोकसहभाग ८८ लाख व शिक्षकसहभाग २१ लाख) ही किमया प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या जनचळवळीमुळेच घडू शकली.

मराठी माध्यमाचे काम पाहून उर्दू माध्यमाच्या शिक्षकांनीही स्वयंप्रेरणेने कामाला सुरुवात केली. गेवराईच्या उर्दू शाळेतील शिक्षकांनी स्वत:चे दीड लाख जमवून इ-लर्निंग सुविधा उपलब्ध केली आहे. प्रगत शैक्षणिक गेवराईसाठी शिक्षकांचा एक प्रयत्न म्हणून ७०० शिक्षकांचा आधार परिवार आपले योगदान देत आहे. आधार परिवाराने ४ लाख रुपये खर्चून गेवराई येथे दोन जिल्हास्तरीय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यशाळांचे आयोजन केले व शिक्षकांना समृद्ध होण्याची संधी दिली. दि.६ डिसेंबर २०१५च्या राक्षसभुवन येथील कार्यशाळेत ७०० सहभागींना श्रीम. तृप्ती अंधारे, ज्योती परिहार, श्री. वसंत हंकारे यांचे मार्गदर्शन लाभले; तर २३ एप्रिल २०१६ रोजी २००० उपस्थितांना ज्येष्ठ लेखक व उपक्रमशील गटशिक्षणाधिकारी पुरस्कारप्राप्त श्री. नामदेव माळी सर व नागरी सेवा पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी, श्रीम. प्रतिभा भराडे ताई या दोहोंचे अनमोल मार्गदर्शन लाभले. तांत्रिक व शास्त्रीय माहिती अत्यंत प्रभावीपणे मांडत त्यांनी सर्वांच्या मनाचा ठाव घेतला. दोन्ही मान्यवरांच्या हस्ते ‘उमलत्या फुलांच्या कविता’ या विद्यार्थ्यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले, दानशूर व्यक्तींचा सन्मान करण्यात आला, वीस हजार रोपांचे वितरण करण्यात आले, माझ्यातर्फे चार केंद्रशाळांना लॅमिनेशन मशिन्स देण्यात आल्या, सोळा निराधार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व आर्थिक मदत देण्यात आली, कर्तबगार मातांचा सन्मानही करण्यात आला. आधार परिवाराला या सर्व कामाचे समाधान मिळाले. सर्वांच्या मनाची तयारी छान झाली.

भराडे ताईंमुळेच माझ्या शिक्षकांना २४ व २५ एप्रिल २०१६ रोजी कुमठे बीटच्या श्रीम. विद्या गाढवे व श्रीम. वनिता निंबाळकर या दोन शिक्षिकांकडून मराठी, गणित, इंग्रजी या विषयांच्या मार्गदर्शनाची संधी मिळाली. अत्यंत बारकाव्याने चर्चा झाली. सुसंवाद घडून आला. ६० शिक्षकांनी कृतियुक्त सहभाग नोंदवला. माझ्या बीटच्या दोन शाळांना रविवारी सुट्टीच्या दिवशी आमच्या विनंतीवरून श्रीम.गाढवे व निंबाळकर यांनी भेट दिली. कुमठेच्या शिक्षिकांनी माझ्या शिक्षकांच्या कामाचे कौतुक करताना पाहावे, यासारखा आनंद तो कोणता?

आमच्या बीटच्या शाळांना बीड, शिरूर, अंबड, पैठण, शेवगाव इत्यादी तालुक्यांतील ७०० पेक्षा अधिक शिक्षकांनी भेटी दिल्या आहेत. या भेटीतून शिक्षकांना प्रेरणा मिळत आहे आणि आमचे शिक्षक समृद्ध होत आहेत, चुका सुधारत आहेत. जोपर्यंत समाधानकारक उत्तर मिळत नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारत राहावे यासाठी शिक्षक मेहनत घेत आहेत, हे खरे! आदरणीय नंदकुमारसाहेब, आदरणीय भापकरसाहेब, आदरणीय नांदेडेसाहेब, माळीसाहेब, भराडे ताई यांचे सतत प्रोत्साहन मिळत आहे. आमच्या छोट्याशा प्रयत्नाचे तोंडभरून कौतुक होत आहे. आमचा प्रवास आणि प्रयत्न राज्यात विविध भागांत मांडण्याची संधी देत आहेत, ही बाब आमचा आत्मविश्वास वाढवणारी व जबाबदारीने कामास प्रेरित करणारी ठरत आहे.




सांगली येथे राज्यस्तरीय चर्चासत्रासाठी निघालो त्या वळी आई म्हणाली, ''कुठे निघालास?'' मी म्हटले, ''सांगलीला.'' ती म्हणाली, ''आत्ताच गेला होतास ना तिकडे?''... ''हो, पुन्हा चाललो आहे. तेव्हा साताऱ्याला गेलो होतो, आता सांगलीला चाललो आहे. तिकडे नंदकुमारसाहेब पण येणार आहेत.'' तिची साहेबांविषयीची आठवण ताजी झाली. बीडच्या दौऱ्यावर असताना बैठक संपून रात्री १०.३० वाजता घरी पोहोचल्यावर तिच्यासोबत जेवताना बैठकीतल्या घटनांबाबत चर्चा सुरू होती. तिला मी सांगितले, की ''ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी सुरू केलेल्या वसतिगृहाच्या जुन्या अटी शिथिल केल्या आहेत. त्या का केल्या असतील, या प्रश्नावर माझे मत मांडले. ते कदाचित साहेबांना आवडले आणि त्यांनी स्वत: टाळ्या वाजवल्या व इतरांनाही माझ्यासाठी टाळ्या वाजवायला सांगितल्या.'' आईने तिचे दोन्ही हात माझ्या गालांवरून फिरवले, त्या वेळी तिच्या हाताचे खरकटे माझ्या गालाला लागलेले दिसले नाही; परंतु त्या वेळी तिच्या डोळ्यांत तरळलेले अश्रू मला पाहायला मिळाले. दोघेही स्तब्ध होतो. 'अश्रू का?' असा प्रश्न मी तिला विचारला नाही. पण मला वाटते, प्रामाणिक प्रयत्नांना एका ध्येयवेड्या व सहिष्णू अधिकाऱ्याच्या उत्स्फूर्त प्रतिसादाचा कदाचित तो अभिषेक असावा!

आज आम्ही आनंद व समाधानाने काम करू शकत आहोत. कार्यप्रेरणा प्रशिक्षण, साहेबांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन, कुमठे बीटने दिलेला विश्वास या गोष्टी आमच्याकडे नसत्या; तर या आनंद व समाधानापासून आम्ही वंचित राहिलो आसतो. कर्तृत्वाचे मूळ आत्मविश्वासात आहे. आत्मविश्वास यशाने वाढतो. यश मिळविण्यासाठी मात्र प्रयत्न करावे लागतात. प्रयत्न करण्यासाठी अगोदर उद्दिष्टे ठरवावी लागतात. उद्दिष्टे ठरवण्यासाठी कार्यप्रेरणा मार्गदर्शक ठरतात. आम्हाला कार्यप्रेरणेमुळे आत्मविश्वास मिळाला, आता यशही मिळत आहे !

**मो. ९४२३३९०१३७**

**मधुकर देशमुख**
उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद
औरंगाबाद

# जिल्हा परिषद शाळेत रचनावादी अध्ययन : एक प्रेरणा

मी १९९३ पासून वर्ग २ अधिकारी म्हणून कार्यरत आहे. गटशिक्षणाधिकारी म्हणून काम करताना प्रत्येक शाळेवर जाऊन विद्यार्थ्यांत रममाण होणे आवडायचे. त्यानंतर मात्र उपशिक्षणाधिकारी म्हणून प्रशासकीय काम सातत्याने करावे लागले. त्यातही प्राथमिक विभागाचा उपशिक्षणाधिकारी म्हणून काम करताना जिल्हा-पातळीवरील बैठकांना उपस्थित राहून विभागाच्या माहितीचे संकलन, संस्करण व सादरीकरण हीच जबाबदारी पार पाडावी लागली. इतर वेळा क्वचितच शाळाभेटी होत. आमची शाळातपासणी मोहीम तशी प्रशासकीय खाक्यातीलच. मात्र, माध्यमिक विभागात कार्यरत असताना उत्तम काम करणाऱ्या शाळांचीच तपासणी करण्याचे जाणीवपूर्वक नियोजन करायचे. पथकात दर्जेदार शिक्षकांना सोबत घ्यायचो. दिवसभर त्यांच्याशी चर्चा व्हायची. शिक्षक काय शिकवतात यापेक्षा विद्यार्थी काय शिकले आहेत, याची चर्चा व्हायची. तपासणीनंतर शिक्षकांसोबत तासनूतास चर्चा करायचो व पुढील नियोजन शिक्षकांकडून करून घ्यायचे, हा सर्वसाधारण शिरस्ता होता. परंतु, केलेले नियोजन पुढील वर्षी अमलात आल्याची खात्री होत नसे.

सप्टेंबर २०१५ मध्ये उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) म्हणून कार्यरत असताना माझ्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राथमिक (शिक्षणाधिकारी) पदाचा प्रभार २२ सप्टेंबर २०१५ रोजी सोपविला. त्याच दिवशी जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा होती. सभा संपल्यावर सर्व खातेप्रमुखांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बोलावून दि. १४, १५, १६ ऑक्टोबरला पंचायतराज समिती येणार असल्याचे सांगितले आणि २० दिवसांत एक प्रश्नावली व लेखापरीक्षण अहवालाचे काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. माझ्यासह जिल्ह्यातील शिक्षण विभागातील सर्व अधिकारी दररोज कार्यालयात बसून केवळ अचूक माहितीच्या संकलनात गुंतले होते. दरम्यान, मा. प्रधान सचिव यांनी दि. ८ ऑक्टोबर २०१५ रोजी मराठ-वाड्यातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकाऱ्यांची बैठक प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित केली. साहेब सायंकाळी ५.३०वा. औरंगाबादेत पोहोचले. सर्वांचा ओळख-परिचय झाला. मी जिल्ह्यातील शाळा, शिक्षक इत्यादी माहिती देऊन २१ शाळा ISO झाल्याचे नमूद केले. सरांनी आमचे मा. उपसंचालक यांच्यासह सर्वांना एकच प्रश्न विचारला- २१च शाळा ISO का? जिल्ह्यातील सर्व शाळा ISO होतील का? सर्वजण विचार करीत असताना मी सर्व शाळा ISO होऊ शकतात, असे सरांना म्हणालो. झाले! दुसऱ्या दिवशीची बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात होणारी होती. सर (बैठकीपूर्वी) म्हणाले, मला एक ISO शाळा व एक कमी पटसंख्येची शाळा पाहायची आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी ८.३० वाजता सरांना यादी दाखविली आणि चांगल्या रस्त्याचा विचार करून जवळची आपतगाव ही ISO शाळा व कचनेर तांडा ही ७ पटसंख्या असलेल्या शाळेवर जाण्यासाठी निघालो. दहा किमीनंतर सरांनी त्या दोन शाळा बदलून इतर शाळा



पाहण्याबाबत सूचना केली आणि ज्या ठिकाणी सरांनी सूचना केली, त्या ठिकाणाहून पाच किमी अंतरावरील बालू नाईक तांडा या शाळेवर सरांसोबत गेलो. ही शाळा टेकडीवर आहे. जाण्यासाठी चांगला रस्ता नाही. सरांची गाडी खाली ठेवून टाटा सुमोमध्ये आम्ही भेटीसाठी गेलो. शाळेत दोन शिक्षकांपैकी एक शाळेत व दुसरे विद्यार्थी जमा करण्यासाठी तांड्यात गेलेले. पटसंख्या ११ पैकी उपस्थित सहा- अशी अवस्था.

या अवस्थेवर चर्चा करण्यापूर्वीच सर पादत्राणे काढून वर्गात गेले व मुलांसोबत चटईवर बसले. गुरुजी मात्र उभे होते. साहेब, उपसंचालक व आम्ही सर्व सरांच्या बाजूला बसलो. सरांनी मुलांसोबत गप्पा मारत त्यांच्याकडून बेरीज-वजाबाकी उपलब्ध खड्यांच्या आधारे करून घेतली. शाळेवर इतर कोणतीही चर्चा न करता वा दुसरी ISO शाळा न पाहता सरांसोबत आयुक्त कार्यालयातील बैठकीस आलो. सरांनी बैठकीत कोणतीही माहिती न मागविता प्रक्रिया अहवालाच्या विश्लेषणावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याबरोबर दोन तास संवाद साधला.

साहजिकच सर्व मुकाअ PSM च्या दृष्टीने विचार करू लागले. आम्ही मात्र PRC भेटीच्या तयारीत पुरते गुंतलो व त्यानंतर दिवाळी सुट्ट्या सुरू झाल्या.

दरम्यान २०, २१ व २२ नोव्हेंबरला सांगलीत परिषद झाली. परिषदेत दोन दिवस प्रत्यक्ष काम केलेले शिक्षक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांनी केलेले काम ऐकावयास मिळाले. तिसऱ्या दिवशी शाळाभेटी झाल्या. शाळा-भेटीत मी चार गटशिक्षणाधिकाऱ्यांना सोबत घेतले होते. प्रत्येकाकडे भाषा व गणित विषयातील विशिष्ट क्षमता मुलांमध्ये येण्यासाठी या शाळेने काय केले, याचे जबाबदारीने निरीक्षण करण्याचे काम सोपविण्यात आले होते. मी स्वत: त्यांच्यासोबत वर्गात तासभर बसून रचनावाद समजून घेण्याचा प्रयत्न केला. मिरज तालुक्यातील या शाळाभेटीत इयत्ता तिसरीच्या मुलीने Abacus च्या साह्याने 2002 ÷4 हा भागाकार अचूक करून दाखवला व या पद्धतीविषयी माझी स्वत:ची धारणा पक्की झाली.

परिषद संपवून औरंगाबादला पोहोचलो व सर्व गटशिक्षणाधिकारी आणि यापूर्वी ज्यांनी रचनावादावर काम सुरू केलेले. शिक्षण विस्तार अधिकारी श्री. रमेश ठाकूर, श्रीम. पदकोंडे, श्रीम. वाशिंबे व श्री. राजेश महाजन यांच्यासह २४/११/२०१५ रोजी बैठक घेऊन

कार्यप्रेरणा शिबिर घेण्याविषयी चर्चा केली. प्रत्येकाने तालुक्यातून चांगले काम करणारे दोन शिक्षक, एक मुख्याध्यापक व एका केंद्रप्रमुखाचे सादरीकरण कार्यशाळेत करण्याचे निश्चित करण्यात आले. मी स्वत: MGM महाविद्यालयातील AC सभागृह उपलब्ध करून घेतले व जिल्ह्यातील उपक्रमशील ३०० शिक्षिकांना उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या.

दि. ३०/११/२०१५ रोजी कार्यप्रेरणा कार्यशाळेत हिंगेवस्ती, पिंप्री, आपतगाव, वरवंडी तांडा, मोळखेडा, फर्दापूर, देभेगाव केंद्रातील वस्तीशाळांमध्ये कार्यरत शिक्षक व मुख्याध्यापकांनी उपस्थितांचा उत्साह वाढविण्यास पोषक अशी सादरीकरणे व प्रत्यक्ष उदाहरणे जिल्ह्यातील शिक्षकांसमोर उभी केली. हे शिबिर ११ ते सायंकाळी ७.३० पर्यंत चालू होते. ३०० शिक्षकांना बोलावले होते, परंतु प्रत्यक्षात ४५० पेक्षा अधिक शिक्षक उपस्थित होते.

मला एकाच विषयावर कधीही दहा-पंधरा मिनिटांपेक्षा अधिक बोलता आलेले नाही. मी दिवसभरातील सादरीकरणातून श्री. गायकवाड, श्री. भरत काळे, श्रीमती महाजन व यांसारख्या १०-१५ शिक्षकांनी केलेल्या कामाचे कौतुक करून रचनावादाचे, Replication, Innovation, Invention व Reconstruction अशा चतु:सूत्रीचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आणि शिक्षकांना रचनावाद स्वीकारण्याचे आवाहन केले. मला आश्चर्य वाटते, त्या कार्यशाळेत शिक्षकांनी मला एक तासभर सहन केले. ही कार्यशाळा संपली तरी शिक्षक सारखे चर्चा करीत घोळक्याने थांबले होते.

त्यानंतर प्रत्येक तालुक्यातून कुमठे भेटीसाठी नियोजन झाले. एकट्या डिसेंबर महिन्यात कुमठे, मिरज, वाई, गडहिंग्लज या ठिकाणी २५०० शिक्षकांनी स्वखर्चाने भेटी दिल्या. डिसेंबरमध्ये प्रत्येक तालुक्यातून कार्यशाळा, प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आली. प्रत्येकाला त्याने केलेले काम कुणाला तरी सांगावे, कुणी तरी पाहावे, अशी मनोमन इच्छा निर्माण झाली.

दरम्यानचा कालावधीत पुन्हा मा. प्रधान सचिव-साहेब औरंगाबाद मुक्कामी आले. साहजिकच साहेब PSM बद्दल विचारतील, म्हणून मी केवळ एक तक्ता तयार केला होता. त्यात शाळासंख्या, भेट दिलेल्या शिक्षकांची संख्या, शिबिरांची संख्या, शैक्षणिक साहित्यनिर्मिती कार्यशाळा व रचनावादी अध्ययन सुरू असलेल्या शाळांची संख्याइतकाच तपशील मी सरांपुढे ठेवला. सर आश्चर्यचकित होऊन म्हणाले, ''दोन महिन्यांत काय झाले की, तुम्ही एवढे काम उभे केलेस?'' मी नम्रपणे सांगितले, ''विभागीय आयुक्त कार्यालयातील आपली बैठक, सांगलीची कार्यशाळा प्रत्येक माझे गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व शिक्षक यांना मिळालेले प्रोत्साहन हेच रचनावाद अमलात आणण्याचे गमक आहे.''

आज प्रत्येकात आत्मविश्वास निर्माण झालेला आहे. प्रत्येक शिक्षक व सहभागी प्रशासकीय यंत्रणा प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र योजनेत स्वत:हून सहभागी होऊन यशस्वी होत आहे.

**मो. ९४२३७४३३३०**

❑❑❑

**प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेपर्यंत झालेल्या वर्गणीदारांनाच पुढील महिन्याचा अंक पाठविण्यात येईल. २५ तारखेनंतर होणाऱ्या वर्गणीदारांना त्या महिन्याच्या पुढील अंकापासून अंक मिळतील. याची नोंद घ्यावी ही विनंती.**

**सीताराम मोहिते**
शिक्षण विस्तार अधिकारी
माणगाव (रायगड)

# रचनावादामुळे बदलले माणगाव

दि. २९, ३० एप्रिल २०१५ रोजी सातारा या ठिकाणी पर्यवेक्षकीय यंत्रणेचे झालेले प्रेरणा शिबिर... त्यातही ३० तारेखला कुमठे बीट व तेथे पाहिलेली शेळकेवाडी शाळा, तेथील रचनावाद व मुलं शिकण्याची प्रक्रिया. यापूर्वी फक्त रचनावाद शब्द ऐकलेला. मूल स्वत:च्या ज्ञानाची निर्मिती करू शकते, हे वाक्य पुस्तकात वाचलेले; मात्र कुमठे बीटमधील शेळकेवाडी शाळेतील पहिली ते चौथीतील विद्यार्थी हे शिक्षकांच्या मदतीने स्वत:चे ज्ञान स्वत:च निर्माण करताना पाहिले व रचनावादाची खऱ्या अर्थाने अनुभूती मिळाली. जवळ- जवळ ३ तास शाळेत घालवले, शिक्षकांशी चर्चा केली, विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. पहिल्या एकाच तासात मुले आमच्याशी इतकी समरस झाली, की शाळा आपली व मुलांनाही आम्ही त्यांचे वाटू लागलो. शाळेतून पाय निघेना. मात्र दुपारी सातारा येथे पुन्हा चर्चासत्र असल्याने निघालो. चर्चासत्रामध्ये गटनिहाय चर्चा सुरू झाली. आमच्यासारखे गट त्या दिवशी कुमठे बीटमधील इतर शाळांत भेट देऊन आले होते. त्यांनाही आमच्यासारखेच अनुभव आल्याबद्दल सांगत होते. त्या दिवशी खऱ्या अर्थाने कळून चुकले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण गुणवत्ता- विकास नेमका कसा करायचा याची गुरुकिल्लीच मला सापडली.

१००% विद्यार्थी शिकू शकतात, असा कुमठे पॅटर्न माणगावमध्ये माझ्या बीटामध्ये राबविण्याचा निर्णय घेतला. दरम्यानच्या काळामध्ये उन्हाळ्याची सुट्टी लागली. त्यामुळे १६ जूनपर्यंत शिक्षक व केंद्रप्रमुख भेटणार नव्हते. दीड महिना काय करावे, काही कळत नव्हतं. कधी एकदा शिक्षक व केंद्रप्रमुखांना भेटून कुमठे बीटात झालेल्या रचनावादाचा चमत्कार सांगू, असे झाले होते. शेवटी दुधावरची तहान ताकावर भागविण्याचे ठरविले. याबाबत साधनव्यक्तीशी सविस्तर चर्चा केली. सुरुवातीला त्यांचा विश्वासच बसला नाही. मात्र मोबाईलवर केलेले व्हिडिओ पाहिल्यानंतर त्यांना थोडी खात्री पटली व जूनपासून रचनावाद पद्धतीने अध्ययन-अध्यापन प्रक्रिया राबविण्याचे निश्चित केले. दि. १६ जून रोजी शाळा उघडल्या. जूनचा तिसरा आठवडा प्रवेशोत्सव साजरा करण्यात गेला. चौथा आठवडा शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षणाच्या पूर्वतयारीला गेला. जुलैचा पहिला आठवडा प्रत्यक्ष सर्वेक्षण. आता काहीही करून दुसऱ्या आठवड्यात बीटमधील शिक्षकांना घेऊन कुमठे बीटचा अभ्यास दौरा करायचा, असा निश्चय केला. पण पुन्हा एकदा माशी शिंकली. ८-९ तारखेला सरळ डेटा प्रणालीचे प्रशिक्षण लागले. सर्व मुख्य व शाळाप्रमुखांनी प्रशिक्षणाला हजर रहावे, अन्यथा कारवाई गट शिक्षण अधिकारी यांनी शिक्षकांना दम भरला. आता काय करावे, मला कळेना. आता गेलो नाही तर पुन्हा महिनाभर जाता येणार नाही. चवथ्या आठवड्यात नियोजित होती PSM पायाभूत चाचणी. जून महिना गेला, आता जुलैही जाणार याची काळजी वाटू लागली. शेवटी गट शिक्षण अधिकारी यांच्या निर्णयाविरुद्ध एल्गार करून बीटमधील शिक्षकांना कुमठे बीट अभ्यास दौऱ्यास येण्याचे आवाहन केले. तालुक्यामध्ये माझ्याबद्दल आदरयुक्त धाक असल्यामुळे बीटमधील २ केंद्रप्रमुख व ५० शिक्षकांनी गट शिक्षण अधिकारी यांच्या आदेशाची पर्वा न करता अभ्यासदौरा

करण्यासाठी तयारी दर्शवली. शिक्षकांनी अभ्यास दौरा करू नये यासाठी काही केंद्रप्रमुख व तत्कालीन गट शिक्षण अधिकारी यांनी प्रयत्न केले. मात्र बीटमधील शिक्षकांचा माझ्यावर विश्वास असल्यामुळे ५० शिक्षक अभ्यास दौऱ्यासाठी तयार झाले. दि. ९ जुलै २०१५ला माणगाव तालुक्यातील उतेखोल बीटचा ऐतिहासिक अभ्यास दौरा निश्चित झाला. आम्ही सर्व जण साताऱ्याला १० वाजता पोहचलो. श्रीमती भराडे ताईंनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. रचनावाद म्हणजे काय, शाळा कशी पाहणार- याबाबत मार्गदर्शन केले. नंतर आम्ही रचनावादी शाळा पाहण्यासाठी निघालो. आमच्या टीमने शिवाजीनगर, आरे दरे, कारी, जकातवाडी या शाळा पाहिल्या. मी अगोदरच शेळकेवाडी शाळेतील रचनावाद पाहिलेला होता. सर्व शिक्षकांनी भराडे ताई व त्यांच्या शिक्षकांनी रचनावाद व मेंदूशास्त्राच्या

एकदा रचनावादाप्रमाणे अध्यापन करतो! अशा प्रकारे उतेखोल बीटमध्ये व रायगड जिल्ह्यात पहिल्यांदा रचनावाद पद्धतीने मुले शिकू लागली व शिक्षक सुगम कर्त्याच्या भूमिकेत दिसू लागली. याबाबतची वार्ता संपूर्ण तालुक्यामध्ये पसरली. संपूर्ण तालुक्यातील शिक्षक कुमठे बीट अभ्यास दौरा करण्याबाबत व शाळा आम्हाला पण दाखवा, अशा प्रकारची मागणी माझ्याकडे करू लागले. बघता-बघता संपूर्ण तालुक्यामधून टप्प्या-टप्प्याने जवळपास ५०० शिक्षकांनी कुमठे बीटला भेट दिली व तेथील रचनावाद व त्या पद्धतीने होणारे अध्ययन- अध्यापन प्रक्रिया समजावून घेऊन ती अंगीकार करण्याचा निश्चय केला. शिक्षकांनी वर्गातील बाके बाहेर काढली. वर्गातील तक्ते, पताका काढून टाकल्या. व्हरांड्यामध्ये खेळाचे पट काढले. वर्गातील फरशीवर उपक्रमाच्या माध्यमातून बेरीज,



माध्यमातून केलेला चमत्कार पाहिला. भराडेताई व कुमठे बीटमधील सर्व शिक्षकांकडून प्रेरणा घेऊन माणगाव तालुक्यातील आपल्या बीटमध्येसुद्धा अशा प्रकारचे काम आपण करू शकतो, असा विश्वास माझ्या सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांना वाटू लागला. त्यानंतर दुपारी ३ ते ४ दरम्यान भराडे ताईंनी शिक्षकांना पुन्हा मार्गदर्शन केले व चांगले काम करण्याची प्रेरणा दिली. अशा प्रकारे रचनावादी अभ्यास दौरा १००% यशस्वी झाला. दौऱ्यातील १००% शिक्षकांना वाटू लागले, कधी एकदा शाळेत जातो व कधी

वजाबाकी, गुणाकार, भागाकार, संख्याज्ञान, अक्षरओळख, शब्द डोंगर अशा प्रकारचे उपक्रम राबवण्यात आले. टाकाऊमधून टिकाऊ साहित्य शिक्षकांनी तयार केले. प्रत्येक शिक्षक मूल समजावून घेऊ लागले. अशा प्रकारे सदर उपक्रमामुळे शाळा, शिक्षक, विद्यार्थी यांच्यात खालील बदल दिसून येतात.

मुलांना आता शाळेत यावयासे वाटू लागले. मुले शाळेत आनंदाने येऊ लागली की, शाळेत मुले रमू लागली. मुलांना शाळेत इतका आनंद वाटू लागला. ५ वाजले तरी

मुले घरी जात नाहीत. शिक्षक ६-६ वाजेपर्यंत शाळेत थांबतात. इयत्ता चौथीमधील मुले शिक्षकांना सांगतात... आम्हाला नापास करा, आम्हाला पाचवीला हायस्कूलला जायचे नाही. आम्हाला याच शाळेत राहायचे आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना रचनावाद व डिजिटलमुळे शाळेबद्दल गोडी निर्माण झाली. हे विद्यार्थीही इतर विद्यार्थ्यांप्रमाणे शिकू शकतात, असा आत्मविश्वास शिक्षकांमध्ये निर्माण झाला आणि आपली मुलेही सर्वसामान्य मुलांप्रमाणे शिकतील, असा विश्वास पालकांमध्ये निर्माण झाला. इंग्रजी माध्यमाऐवजी मुलांचा ओढा मराठी माध्यमाच्या शाळांकडे ओढला गेला. रचनावादाने बदललेल्या शाळा पाहून लोकसहभाग वाढला. लोकसहभागातून सर्व शाळा रंगविल्या गेल्या, बालस्नेही वातावरणनिर्मिती झाली. डिजिटल शाळेसाठी लाखो रुपये जमा झाले. कुमठे बीट अभ्यास दौऱ्याने काम करण्याबाबत शिक्षकांची मानसिकतेत मोठ्या प्रमाणात बदल झाला. शासनाने करोडो रुपये खर्च करून प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांच्या मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यामध्ये अपयश आले. पण, एक दिवसाच्या अभ्यास दौऱ्याने शिक्षकांची मानसिकता बदलली व ते मनापासून कामाला लागले.

संपूर्ण तालुक्यात माझ्या नेतृत्वाने तालुका रचनावादी कधी झाला, हे मला कळलेच नाही. मी, माझे सर्व केंद्रप्रमुख, साधनव्यक्ती व शिक्षक हे सर्व भारावल्याप्रमाणे कामाला लागलो. मी नंतर बीटनिहाय प्रेरणा शिबिराचे आयोजन करून रचनावाद या प्रणालीबद्दल बहुविध बुद्धिमत्ता, आधुनिक मेंदू संशोधन व विद्यार्थ्यांचा विकास याबद्दलची माहिती शिक्षकांना त्यात देण्यात आली. मूल नैसर्गिक पद्धतीने कसे शिकते, मूल समजून घेणे म्हणजे काय, मुलांच्या मेंदूचा विचार करून कसे अध्यापन करावे, विद्यार्थ्यांच्या ग्रहणक्षम असलेल्या मेंदूला वेगात शिकण्याची संधी कशी द्यावी, वर्गात सुलभकाराच्या भूमिकेत कसे वागावे-याबाबतच्या संकल्पना शिक्षकांना स्पष्ट करून देण्यात आल्या. त्यानंतर या गोष्टींची प्रभावी अंमलबजावणी शिक्षकांनी आपल्या शाळेमध्ये सुरू केली व बघता-बघता संपूर्ण तालुक्यातील शैक्षणिक वातावरण बदलण्यास सुरुवात झाली. दरम्यानच्या काळामध्ये ठाणे जिल्ह्यातील पष्टे पाड्यातील तंत्रस्नेही शिक्षक श्री. संदीप गुंड यांची 'मिशन डिजिटल माणगाव' ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. रविवार सुट्टीचा दिवस असूनदेखील ३०० पेक्षा जास्त शिक्षकांनी संदीप गुंड यांच्या अनमोल अशा मार्गदर्शनाचा लाभ घेतला. रचनावादाला डिजिटल तंत्रज्ञानाची जोड मिळाली व जिल्हा परिषदेच्या १००% शाळा या ज्ञानरचनावादी शाळा तर झाल्याच; पण त्याबरोबर गुंड सरांच्या प्रेरणेतून ५० शाळा Interactive digital शाळा झाल्या, त्याचा फार मोठा परिणाम शाळांच्या गुणवत्तेवर दिसून आला. आता मुले स्वत: शिकू लागली, कृतियुक्त व उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षणाचा आनंद घेऊ लागली. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणावर वाढू लागला. वर्गात झालेल्या रचनावादी बदलामुळे शाळेत कधीही न येणारी मुले आता येऊ लागली. वर्गातील उपस्थितीचे प्रमाण वाढले. वर्गात कधीही न बोलणारे विद्यार्थी आत्मविश्वासाने बोलायला लागले. मनात पडलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शोधण्याची जिज्ञासा त्यांच्यामध्ये निर्माण झाली. विद्यार्थी मोठ्या प्रमाणात अभिव्यक्त होऊ लागले. त्यामुळे शाळेमध्ये व घरामध्ये विद्यार्थ्यांच्या वर्तनात सकारात्मक फरक जाणवू लागला. त्यामुळे रचनावाद प्रणालीबद्दल पालकांनाही उत्सुकता वाटू लागली. या सर्व गोष्टीचा परिणाम तालुक्याच्या शैक्षणिक गुणवत्तेवर दिसून आला. मार्चअखेर प्रगत शाळा म्हणून १०० शाळा घोषित करण्यात आल्या. उर्वरित शाळांमधील ५ ते १०% विद्यार्थी अप्रगत असल्यामुळे त्या प्रगत घोषित करता आल्या नाहीत. मात्र दिवाळीपूर्वी या सर्व शाळा प्रगत होतील, असा मला आत्मविश्वास आहे.

सदर माणगाव तालुक्याच्या प्रगतीसाठी आम्हा सर्वांना प्रेरणा मिळाली ती मा. प्रधान सचिव नंदकुमारसाहेब, प्राध्यापक रमेश पानसेसर, रचनावादी शिक्षण चळवळीच्या प्रणेत्या श्रीम. प्रतिभा भराडे ताई, डाएट पनवेल प्राचार्य डॉ. गजानन पाटीलसर, शिक्षणाधिकारी श्री. बडेसाहेब, पंचायत समिती माणगाव सभापती, उपसभापती, गटविकास अधिकारी यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य मिळाले , त्यातूनच. त्यामुळेच वरील काम करणे शक्य झाले.

**मो. ९२७३९२५८२०**

**अभय विजयसिंह परिहार**
प्राचार्य जिल्हा परिषद संस्था
भंडारा

# माझा ज्ञानरचनात्मक अध्ययनप्रवास

दि. १० नोव्हेंबर २०१५ चा दिवस अतिशय आल्हाददायक आणि प्रेरणात्मक. आजचा दिवस आम्हा भंडारा जिल्ह्यातील शिक्षणक्षेत्रातील अधिकारी व शिक्षक बंधू-भगिनींसाठी अतिशय महत्त्वाचा होता. कारण जुन्या सर्व रूढी, परंपरा, औपचारिकतेला फाटा देणारे अधिकारी, शिक्षक-विद्यार्थी यांच्यामध्ये मिसळणारे मानवतावादी शोलय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा. श्री. नंदकुमारसर आमची प्रेरणादायी समुपदेशन सभा घेणार होते. ठरल्याप्रमाणे नियोजित सभेला सुरुवात झाली. शिक्षणाधिकारी-प्राथमिक व मी 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्रा'च्या शासननिर्णयानुसार जिल्ह्यातील कामाचा आढावा सादर केला. यामध्ये पायाभूत चाचणीची यशस्वी अंमलबजावणी करण्याकरिता नेहमीसारख्या आमच्या सभा व त्या सभेची दिनांकनिहाय जंत्री आम्ही सादर केली. सरांनी हे सर्व लक्षपूर्वक ऐकून घेतले व आम्ही दिशा भरकटलेले कसे आहोत, याचा आपल्या अभ्यासपूर्ण खास व मार्मिक शब्दांत समुपदेशनपर एका उत्कृष्ट गुरूच्या नात्याने दृष्टांत दिला.

आम्ही या तारखेपर्यंत नेहमीसारखे वरून आलेल्या उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करावयाची, अशा धारणेतून उपक्रम यशस्वी करायचा प्रयत्न करीत होतो. खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानरचनात्मक अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ऊर्ध्वगामी उच्चस्तर श्रेणीविकासाच्या विचारामध्ये आम्ही शून्य होतो. भंडारा प्रगत करणे हा आपला मानबिंदू आहे व ते आम्ही करणारच, हीच प्रेरणा तसेच स्वयंप्रेरणा आजच्या दिवशी आम्हाला मिळाली आणि आम्ही ज्ञानरचनात्मक अध्ययनप्रवासाकडे वाटचाल करण्यास सुरुवात केली. तत्पूर्वी, मा. नामदेव माळी-गट शिक्षण अधिकारी व मा. प्रतिभाताई भराडे- वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी कुमठे बीट यांनी आम्हा जिल्ह्यावासीयांना ज्ञानरचनावाद व मेंदूविकसन याबाबत प्रेरणा दिलेलीच होती. पूर्वाश्रमीची ओळख, त्यांची सहकार्याची भावना, मा. सरांची प्रेरणा व आमची स्वयंप्रेरणा या चतु:सूत्रीच्या बळावर भंडारा प्रगत होणार, या आशेवर आमच्या प्रवासाला सुरुवात झाली.

जिल्ह्यातील सेवाज्येष्ठ शिक्षकांचे निवडश्रेणी प्रशिक्षण आयोजित करण्याची जबाबदारी डायटची असते. दीपावलीच्या सुट्ट्या संपण्यापूर्वीच पाच दिवस अगोदर निवडश्रेणी प्रशिक्षण आयोजित केले आणि काळाच्या मागणीनुसार निवडश्रेणी अभ्यासक्रमामध्ये बदल करून कुमठे बीट अभ्यास दौरा भेटीचे नियोजन केले. जवळपास ३८० शिक्षक-शिक्षिकांनी कुमठे बीटचा यशस्वी अभ्यास दौरा पूर्ण केला. जे-जे चांगले ते-ते आणण्याचा प्रयत्नही केला. 'प्रत्येक मूल शिकते' ही कुमठे बीट अभ्यास दौऱ्याच्या परतीच्या प्रवासात प्रत्येक शिक्षकाने अनुभव-प्रचीती घेतली.

पाहता-पाहता डिसेंबर २०१५ महिना उजाडला आणि केंद्र, बीट, तालुका पातळीवर चिंतन, प्रेरणा व संकल्प सभेच्या निमित्ताने शिक्षक एकत्र जमू लागले. विद्यार्थ्यांकरिता काही तरी करायचे आहे, 'प्रगत भंडारा' करायचा आहे, ज्ञानरचनात्मक अध्ययनपद्धतीचा अंगीकार करायचा आहे- हेच विषय आता चर्चेचे होऊ लागले. पगारवाढ, पदोन्नती, बदली, वार्षिक वेतनवाढ या शिक्षक-शिक्षिकांमधील चर्चेच्या विषयांना आता पूर्णविराम लागला असून जो-तो विचार करतो, बोलतो ते - 'ज्ञानरचनावादाबद्दलच.'



ज्ञानरचनात्मक अध्ययनपद्धतीचा अंगीकार करायचा म्हणजे शिक्षकांना लागणार 'अध्ययन-साधन'. कोणत्याही निधीच्या मदतीशिवाय शिक्षकांनी स्वयंप्रेरणेने स्वत:चे पैसे खर्चून केंद्र, बीट, तालुका स्तरावर अध्ययन- साधनाची निर्मिती केली. फरशी रंगविली व विद्यार्थीदेखील बदललेल्या वातावरणात आनंदाने समरस होऊ लागले व उपस्थिती वाढली.

राज्यस्तरीय शिक्षण परिषद सांगली व वाशिमच्या जोरावर 'जिल्हास्तरीय शिक्षण परिषदे'चे आयोजन करण्यात आले; ज्यात शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांनी सादरीकरण केले व जिल्ह्यात 'नाही रे! नाही रे !' म्हणणारे देखील कामाला लागले.

आमच्या कामाची दखल राज्यातील आपण सर्व वरिष्ठांनी घेतली व कौतुकाची थापदेखील दिली; ज्यातून आम्ही अधिक प्रेरणेने, ऊर्जेने, उत्साहाने, अधिक गतीने कामाला लागलो. जिल्ह्यातील सर्व शिक्षकांना ज्ञानरचनावाद संकल्पना अधिक स्पष्ट व्हावी याकरिता DVDची निर्मिती करून प्रत्येक शाळेला वितरित करण्यात आली.

मा. आयुक्त, शिक्षण यांच्या आवाहनानुसार आज भंडारा जिल्हा १००% मिशन मोबाईल डिजिटल स्कूल असून राज्यात त्याने अव्वल क्रमांक पटकावला म्हणून अभिनंदनास पात्रदेखील ठरला व तसे साहेबांनी अभिनंदनदेखील केले. या आमच्या कामाची नोंद मीडियानेदेखील स्वत:हून घेतली.

आज जिल्ह्यात 'न भूतो न भविष्यति' इतके सकारात्मक वातावरण बनले असून राज्यस्तरावरून आवाहन केली जाणारी प्रत्येक बाब उचलून धरली जाते. मग ती शिक्षणाची वारी, प्रगत शाळाभेट, अभ्यासदौरा, तंत्रज्ञान प्रशिक्षण, स्पोकन इंग्लिश प्रशिक्षण, भाषा व गणित प्रशिक्षण, नेतृत्वविकास प्रशिक्षण- काहीही असो; भंडारा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व प्रत्येक बाबतीत आहेच.

आज जिल्ह्यातील ७६७ जि. प. प्राथमिक शाळांपैकी ४१४ शाळा प्रगत म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा १००% प्रगत होईपर्यंत हा आमचा ज्ञानरचनात्मक प्रवास अविरत चालूच राहणार आहे.

**मो. ९००४११९९२६**

फारूक एस. काझी

# विनोदबुद्धी आणि शिक्षण



काही वर्षांपूर्वी आमीर खानचा एक सिनेमा येऊन गेला आणि मुलांच्या शिक्षणाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी देऊन गेला. 'तारे जमीं पर' असं नाव होतं त्याचं. त्यात आमीर जेव्हा पहिल्यांदा वर्गात जातो, तेव्हा तो नॉर्मली शिक्षक जशी एन्ट्री करतात तशी एन्ट्री करत नाही. तो जोकर बनतो अन् मुलासोबत नाचत-नाचत वर्गात प्रवेश करतो. एक धम्माल होऊन जाते वर्गात. अबोल, घुमी, घराच्या आठवणीत रमलेली मुलं लगेच त्याच्याशी एकजीव होऊन जातात. आनंद हा आपल्यातला समान दुवा झाला की, ओळख-पाळख बाजूला सारून माणूस तुमच्याशी एकरूप होऊन जातो. हे वर्गात प्रत्यक्षात घडू शकतं, पण आपल्याकडे सहसा असं घडत नाही. पण असं नाचून-गाऊन जरी आपल्याला मुलांना नाही रमवू शकलो, स्वत:शी नाही एकरूप करून घेऊ शकलो तरीही; एक गोष्ट आहे, जी तुम्हाला मुलांशी व मुलांना तुमच्याशी बांधून टाकते. ती गोष्ट म्हणजे, तुमच्यातील विनोदबुद्धी.

विनोदबुद्धी म्हणजे तुम्ही उठ-सूट विनोद करून मुलांना हसवणं नव्हे. तुमच्या चेहऱ्यावरील मिस्कील हसूही वर्गातील तंग झालेलं वातावरण निवळून टाकतं. विनोदबुद्धी असणं म्हणजे सतत विनोद किंवा कोट्या करणं असत नाही. अडचणी-समस्या यांच्याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणं, त्या दूर करण्यासाठी प्रयत्न करणं अन् त्यातून बाहेर पडणं, तेही ताण-तणाव दूर ठेवून- याला म्हणायची तुमच्यातील विनोदबुद्धी.

Teachers should be aware that humour is as beneficial to their own behaviour as it is to that of their students. Humour can help us to see stressful situations in a more positive light, or at

least a less pessimistic one. शिक्षकाकडे विनोदबुद्धी का असावी, याचं उत्तर या वाक्यात आहे. तो केवळ गमत्या करणारा, अशीच त्याची ओळख नाही.

तसेच Robert Sylwester यांनी आपल्या A Teacher's Sense of Humor या लेखात याचं थोडक्यात विवेचन केलं आहे.- A sense of humor in a teacher involves more than simply telling jokes. Rather, it seems to deal more with a teacher's ability to pleasantly communicate that current behaviour is approaching the edge of what's considered normal and/ or acceptable.

वरील दोन्ही वाक्यांवरून एकच गोष्ट आपल्या लक्षात येईल की, शिक्षकाची विनोदबुद्धी ही त्याच्या गुणांपैकी एक आहे, जिचा समावेश चांगल्या शिक्षकांच्या गुणवैशिष्ट्यांत करता येईल- ज्याला आपण आनंदी वृत्ती असंही म्हणू शकू.

मुलं लहान असोत की मोठी, ती अनेकदा अनेक तणावांना सामोरी जात असतात. परंतु प्रत्येक शिक्षकाकडून त्यांची दखल घेतली जातेच, असं नाही. मूल वर्गात आल्यावर त्याच्या मनात अनेकदा कल्लोळ माजलेला असतो. काही प्रश्न सतावत असतात. पण, सामान्यपणे शिक्षक त्याकडे लक्ष न देता आपलं शिकवणं चालूच ठेवतात. एकदा चौथीच्या वर्गातील अमित एकदम गुमसुम-गुमसुम होता. नेहमी हसणारा अमित आज एवढा गुमसुम का, हे कळेना. मी त्याला जवळ बोलावलं आणि विचारलं, पण पठ्ठ्या काही केल्या बोलेना.

''अरे आज आमतुचं हसू कुणी चोरून नेलं रे? कुणी चोरलं, सांगा पाहू?'' असं म्हणताच सगळा वर्ग हसू लागला आणि बघता-बघता अमितही हसू लागला. त्याचा ताण निवळला आणि त्याने सकाळी त्याला आईनं मारल्याचं सांगितलं. दिवसभर त्याच्या चेहऱ्यावर उदासी आली नाही. आपल्यातली आनंदी वृत्ती, विनोदबुद्धी जर मुलांचे ताण निवळायला मदत करत असेल; तर मला वाटतं, ते अध्यापनातल एक महत्त्वाचं तंत्र आहे, जे फार प्रभावी आहे. तणावाखालील मुलं मोकळेपणानं बोलत नाहीत व शिकत तर नाहीतच नाहीत.

तुमच्यातील विनोदबुद्धीने वर्गातील वातावरण अगदी प्रसन्न व शिकायला एकदम पूरक बनतं.

❖ **काय साधतं विनोदबुद्धीने? :**

- ताणतणाव दूर होतात.
- वर्गातील वातावरण हे मुक्त व प्रसन्न होतं.
- मुलांना आकर्षित करून घेऊन त्यांना शिकतं करण्यात मदत मिळते.
- मुलांशी एक नातं बनतं- ज्यामुळे शिक्षा, दंड, शिस्त, नियंत्रण अशा गोष्टींची गरजच उरत नाही.
- शिक्षक व विद्यार्थी यांत समन्वय साधला जातो.
- निकोप शैक्षणिक वातावरण तयार होते.
- मुलांचा आत्मविश्वास वाढतो.
- मुलांना व शिक्षकांना सतत प्रेरणा मिळत राहते.
- शिक्षक व विद्यार्थी यांत एक सकारात्मक नातं तयार होतं.

❖ **काय टाळता येईल? :**

- कोणत्याही मुलाचा/मुलीचा अवमान होईल अशी भाषा नको.
- मुलांच्या मनाला दुखावेल असं बोलणं नसावं.
- शारीरिक व्यंग, रंग, उंची, दिसणं यावरून शिक्षकांनी कोणतंही विधान करू नये. मुलांच्या मनात त्यामुळे न्यूनगंड निर्माण होतो.
- जात, लिंग, भाषा, कपडे यावरूनही कुणावर शाब्दिक वा कृतियुक्त विनोद करू नये. अशाने मुलांची व्यक्तिमत्त्वं खुजी बनतात, शिक्षकांप्रती मुलांच्या मनात रागाची भावना निर्माण होऊ शकते.

आपल्या विनोदबुद्धीचा वापर करून आपण अधिक समृद्ध असं शैक्षणिक वातावरण बनवू शकतो; गरज आहे ती आपल्यातील आनंदी वृत्ती जागृत करण्याची व चेहऱ्यावर एक स्पेशल स्माईल कायम राखून ठेवण्याची.

**मो. ९९२१३८०९६६**

सुचिता पडळकर

# खरी कमाई

दि. २७ फेब्रुवारीला मराठीदिनानिमित्त भाषा-बहराचा कार्यक्रम होणार होता, कोणी कविता म्हणणार होतं, कोणी नाट्यछटा करणार होतं. कोणाचा पोवाडा होता तर बरीच मुलं छान वाचून दाखवणार होती. आपापला भाषिक फुलोरा सर्वांसमोर आणणार होती. ही काही स्पर्धा नव्हती, चढाओढ नाही, वरचढपणा नाही; हे फक्त भाषेवरचं प्रेम होतं. या कार्यक्रमाचं एक अंग म्हणून विद्यालयात या वर्षी मुलांसाठी व शिक्षकांसाठी आलेल्या पुस्तकांचं प्रदर्शनही भरवलं होतं. वर्षभर मुलांनी वाचलेली ही पुस्तकं एकत्रितपणे पाहताना यातलं आपण काय काय वाचलं, काय आणि किती आवडलं याचा गलका उडाला होता. ही सगळी पुस्तकं नेहमी हाताळली होती; पण पुस्तक प्रदर्शनाभोवती दिवसभर मुलांचा गराडा होता. हे रूप विलोभनीय होतं. वाचनालय सांभाळणाऱ्या ताईंनी मुलांच्या वाचनाबद्दलच्या नोंदी ठेवल्या होत्या. मुलांना वाचतं करण्यासाठी त्या नवनव्या युक्त्या लढवत असत. आवडलेल्या पुस्तकाची गोष्ट मुलं लिहीत. ती सर्वांसाठी त्या लावत. बहुवाचक असणाऱ्या पुस्तकांतील मुलं, प्राणी, स्थळं इ. पात्रांची नावे लिहून, 'हे कोणत्या पुस्तकात भेटतात?' असा एखादा प्रश्न लावत. सर्वांत जास्त पुस्तकं वाचणाऱ्या मुला-मुलींची नावं पुस्तकाच्या कपाटावर लावून ठेवत. असं बरंच काही काही चाले.

वर्षअखेरी चारही वर्गांतल्या सर्वांत जास्त पुस्तकं वाचणाऱ्या मुलांना ताईंनी शाळेच्या पुस्तकखरेदीसाठी नेले. म्हटलं तर हे मुलांसाठी मोठचं बक्षीस होतं; म्हटलं तर टाकलेली जबाबदारी होती. कोल्हापुरातील शाहू स्मारक सभागृहात भरलेल्या पुस्तक प्रदर्शनात ही बारा मुलं ताईंबरोबर गेली. या मुलांत पुस्तक प्रदर्शन पाहायला जाण्याची पहिलीच वेळ असणारी सात मुलं होती. ''शाळेतल्या सगळ्या मुलांसाठी तुम्ही पुस्तकं घेत आहात. आज आपण साधारण २५०० रुपयांची पुस्तकं घेऊ शकणार आहोत. सभागृहात कसे वागा, पुस्तकं कशी हाताळा, निवडलेली पुस्तकं कुठे ठेवा.'' इ. इ. ताई बोलल्या.

ही शनिवारची सकाळ होती. सभागृहात तुरळक माणसं होती. शांतता होती. मुलांनी न सांगताच सभागृहाबाहेर चपला काढल्या. काऊंटरवरच्या दादांना आपल्या येण्याचा हेतू सांगितला. अत्यंत जबाबदारीनं ती वावरत होती. प्रत्येकाजवळ आठ-दहा पुस्तकं जमल्यावर दादांच्या परवानगीनं एका बाजूला गोल करून बसली आणि प्रत्येकानं घेतलेल्या पुस्तकातून निवड-छाननी सुरू झाली. आपण हे पुस्तक कितवीसाठी आणि का घेतलंय, हे पटवून देत होती; पण गटानं निवडलंच पाहिजे, असा कोणाचाच हट्ट नव्हता. यात ताईंच्या मताला मान होता. गठ्ठ्यात एक पुस्तक भूगोल अध्यापनाविषयी होतं. ताई म्हणाल्या, ''असे हे पुस्तक तुम्हाला कळेल?'' पुस्तक आणणारा मुलगा तत्परतेनं

म्हणाला, ''ताई, हे पुस्तक तुमच्यासाठी; आम्हाला शिकवताना तुम्ही वाचा.'' शाळेसाठी पुस्तकं निवडताना मुलांनी कोणालाही सोडलं नव्हतं.

पहिली-दुसरीतल्या मुलांसाठी विद्यालयानं छोटे-मोठे वाचनपाठ तयार केले आहेत. ही कार्डे वाचताना ती पटकन वाचून संपतात आणि कळतातसुद्धा. म्हणून यांना सुरुवातीला पसंतीक्रम असतो. तिसरी-चौथीतल्याही काही मुलांना अख्खं पुस्तक वाचणं नको वाटतं. त्यांच्यासाठी गोष्टी सुट्या करून ठेवल्या की, ते वाचणं सोप्पं वाटतं. या मार्गानं मोठी पुस्तकं वाचण्याकडे मुलं वळतात. मुलांना वाचतं करण्यासाठी पुस्तकांखेरीज अन्य भरपूर साहित्य आपल्या अवती-भवती असतं. दिनदर्शिकेतील माहिती, वस्तूंच्या वेष्टनांवरील मसुदा, जाहिरातींचे कागद, कार्यक्रमांच्या प्रवेशिका- सगळेच कसे वाचायला शिकवत असतात. विद्यालयात वाचन-साहित्य म्हणून वर्तमानपत्राचा भरपूर उपयोग केला जातो. सहज उपलब्ध, स्वस्त आणि ग्राह्य शैक्षणिक साहित्य आहे हे. चर्चा करण्यायोग्य बातम्या, बोलके फोटो, निवडक जाहिराती, कविता, कोडी, गोष्टी... असा किती किती अंगानं वर्तमानपत्राचा उपयोग होतो. शिवाय घडीकाम, कोलाजकाम, लगदाकाम यासाठीही हे उपयोगी पडतं. कागदी पिशव्या, कागदी टोप्या यासाठी तर वर्तमानपत्रच गरजेचंच.

तर एकदा असं ठरलं की, संपूर्ण महिनाभर वर्तमानपत्रातून शिकण्यावर भर द्यायचा. गटकामातून भित्तिपत्रकं तयार झाली, चिकटवही-कात्रणं असे कमी वापरातले शब्द पुन:पुन्हा ऐकू येऊ लागले. घराघरात वर्तमानपत्राचं प्रकटवाचन होऊ लागलं. हा छोटेखानी प्रकल्प चांगलाच प्रिय झाला. ताई म्हणाल्या, ''प्रत्येकानं घरी येणारं या महिन्याभराचं वर्तमानपत्र नीट ठेवा. महिनाअखेरी छान गठ्ठा बांधून शाळेत आणा. ती रद्दी आपण शाळेतच विकू या आणि मिळालेल्या पैशातून वाचनालयासाठी पुस्तक घेऊ या. वर्तमानपत्र तर वाचू याच, ती विकून आलेल्या पैशातून घेतलेली पुस्तकंही





वाचू या.'' ही विद्यालयसेवा मुलांना फार आवडली. पालकांनीही या योजनेचं स्वागत केलं.

चौथीतल्या अकीफच्या आईचा शाळेत निरोप आला. आम्ही घरी वर्तमानपत्र घेत नाही, त्यामुळे शाळेत रद्दी पाठवता येणार नाही. पण रद्दीच्या पैशातून तुम्ही पुस्तकं घेणार आहात, तर मी घरातलं भंगार विकून पन्नास रुपये पाठवू का? अकीफचे आई-वडील अल्पशिक्षित. त्यांना आत्तापर्यंत वर्तमानपत्राची वाचनासाठी गरज पडली नव्हती. त्यांचा निरोप मात्र 'ढाई अक्षर प्रेम का पढे सो पंडित होय' या परंपरेतला होता. ताईंनी परतीचा निरोप पाठवला- ''पुस्तकासाठी पैसे पाठवू नका. त्या पैशांतून अकीफला फक्त रविवारचं वर्तमानपत्र घेऊन द्या...'' अधून-मधून ताई अकीफला विचारायच्या- ''वर्तमानपत्र वाचतोस का?'' अकीफ म्हणाला, ''दर रविवारी सकाळी लवकर मी चौकातून वर्तमानपत्र आणतो आणि घरी सगळ्यांना गोष्ट वाचून दाखवतो.'' ताई मनात म्हणाल्या, भंगाराचे पैसे खूप खूप मोठे होवोत!

ठरल्याप्रमाणे महिनाअखेरी रद्दीचे गठ्ठे घराघरांतून येऊ लागले. कागदाचे कोपरे जुळवलेल्या घड्या, घट्ट बांधणी, वर आणणाऱ्या मुला-मुलीचं नाव सहलीला निघालेली मुलं शाळेत जमतात तेव्हा जशी दिसतात, तसे हे गठ्ठे दिसत होते. स्पेशल महत्त्व आलेले. गठ्ठ्यांची आवक एवढी वाढली की, आता हे कसे सांभाळायचे- हा प्रश्न पडावा. मग आमच्या बोलावण्याप्रमाणे रद्दी डेपोचे दादा त्यांचा टेंपो घेऊन आले. या रद्दीचं पुढं काय होतं, रद्दीचा दर कसा ठरतो? वगैरे वगैरे चर्चा झाल्यावर रद्दीचे गठ्ठे वजन-काट्यावर चढू लागले. ही रद्दी तब्बल ३२० किलो भरली. त्याचे तीन हजार दोनशे रुपयांची पुस्तकं घेणं, ही मुलांना स्वकष्टाची कमाई वाटली.

माझ्या मनात खूपदा येतं की, मुलांनी खरी कमाई करावी असा उपक्रम जेव्हा शाळा घेतात; तेव्हा मुलांना शारीरिक कष्टाची कामं सुचवली जातात. कोणाचं अंगण झाडा, कोणाची फरशी पुसा, तांदूळ निवडून द्या..... कष्टाच्या कामाची लाज वाटू नये, हा जरी एक हेतू असला; तरी मुलांना आपण बालसुलभ, बौद्धिक कामे सुचवू शकू का? तर, ते शक्य आहे. गरजूंना वाचून दाखव, कोणाचं पत्र लिहून दे, कोणाची पाणी-लाईटची बिले भरून ये. शाळेमध्ये मुलांनी निर्माण केलेल्या वस्तूंचा बाजार भरतो, तेव्हा ती त्यांची खरीखरी कमाई असते.

तर, अशी ही कमाई. एक छोटासा हेतू मनात धरून सुरू झालेला प्रकल्प अनेक ताण्याबाण्यांनी विणला जातो. प्रकल्पामुळे विषयाची व्याप्ती वाढते. मुलं अधिक जवळ येतात. माणसं कळतात. प्रकल्पात मन गुंतत गेलं की, अपेक्षिल्यापेक्षा जास्त आणि संपन्न हाती लागतं. शिकण्या-शिकवण्यात जान येते.

**मो. ९४२०३२४७१३**

# प्रतिक्रिया — अदिती नातू




स. न. वि. वि.

मे २०१६ च्या शिक्षणवेधच्या अंकात श्रीम सुषमा पाध्ये यांचा ‘संदर्भाहीन शिकणे’ हा लेख खूप छान झाला आहे. त्यांनी अत्यंत सोप्या सोप्या उदाहरातून व्यापक विषयाची मांडणी केली आहे.

त्यांनी सारांश रूपाने मांडलेले चार मुद्दे आपल्याला अंर्तमुख करतात. एक शिक्षक म्हणून किंवा समाज घटक म्हणून आपल्याकडून या चुका अनेकदा होत असतात. समोरचा विद्यार्थी / बालक कोणत्या सामाजिक पार्श्वभूमीतून आलेला आहे याचा संदर्भ लक्षात न घेता आपण त्याची भाषा आचार-विचार वाईट ठरवतो. आणि त्या मुलावर तसा शिक्काही मारतो. खरं तर कोणतीच व्यक्ती ही मूलत: वाईट नाही या मानसशास्त्रीय आधारालाच आपण धक्का देत असतो.

भाषेच्या संदर्भात ही बाब प्रामुख्याने जाणवते. शुद्ध भाषा म्हणजे नक्की काय? बोली भाषेचे व्यक्तीच्या संदर्भातील अस्तित्व आणि त्याचा प्रमाण भाषेवर होणारा परिणाम हे लक्षात न घेता आपण प्रत्येक गोष्ट चूक  बरोबरच्या पारड्यात तोलतो. याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. कारण त्यामुळे मुले भाषिक अभिव्यक्तीपासून दूर पळतात. गप्प होतात. वैचारिक संपन्नतेपासून कोसो मैल दूर राहतात.

खरं तर शाळेने असा विचार करायला हवा की मूल ज्या समाज गटातून आलेले आहे आणि जे अनुभव त्याला त्या समाजाकडून मिळणार नाहीत ते अनुभव शाळेने द्यायला हवेत. ते अनुभव भाषिक, सांस्कृतिक, नागरिकत्व या विविध पातळ्यांवरचे असतील. आणि ते देण्यासाठी विविध माध्यमांचा वापर केलेला असेल. या सर्वांचा परिणाम व्यक्ती म्हणून घडताना विविध संदर्भासह त्याचे शिकणे होईल.

आदिती नातू

# तुमचे Online प्रोफाईल तयार करण्यासाठी १० पथ्ये

गेल्याच लेखात (मे २०१६) आपण पाहिलं की, इंटरनेटमुळे अनेक छोट्या-छोट्या गावांतील, शहरांतील व्यक्तीसुद्धा त्यांच्या घरातून कामे करून देऊ शकतात, करून घेऊ शकतात. अगदी छोट्यात छोट्या प्रमाणात एक संगणक व जोडीला एक इंटरनेट कनेक्शन इतकासुद्धा सेटअप पुरेसा आहे. तरीही प्रत्यक्ष काम देण्या-घेण्या-पूर्वी कोणत्या बाबी प्रथम पहिल्या जातात, हे पाहू या. काम मिळवावयाचे झाल्यास काय, हे इथे पाहू या.

**आम्ही कोण म्हणून काय पुसता? हा बाणा कामाचा नाही !**

साधारणत: होतं काय की, आपण आपापल्या कामात तरबेज असलो आणि स्थानिक पातळीवर जर आपलं थोडं-फार नाव वगैरे झालेलं असेल, तर आपल्या कामाबद्दल आपल्याला थोडा अभिमानही निर्माण झालेला असतो. स्थानिक पातळीवर हे नाव + आपल्याला ओळखणारी मंडळी ह्यामुळे बऱ्याचदा आपल्याकडे कामे समोरून येतात अथवा आपल्याला आपल्याविषयी फार सांगायलाही लागत नाही. नवखे असाल तर सांगायची आवश्यकता भासते, पण तरीही प्रत्यक्ष भेटीत देहबोली वगैरे बरंचसं निभावून नेत असते. त्यामुळे समोरची व्यक्ती काम देताना अथवा आपल्याकडून काम घेतानाही आपल्याबद्दल बरं-वाईट मत बनवते व त्याचा प्रभाव त्या-त्या व्यवहारावर पडतो.

**‘इंटरनेट’ची गणितं वेगळी**

परंतु इंटरनेटवर मात्र हे शक्य नसते. इंटरनेटवर तुमच्याबद्दल जे काही बरं-वाईट मत तयार होईल, ते समोर... स्क्रीनवर दिसेल, त्यावरूनच! गेल्या लेखात पाहिल्याप्रमाणे, कामे देणाऱ्या-घेणाऱ्या ज्या काही साईट आहेत, त्यांवर तुमच्यासाठी Your Profile किंवा My Profile हा एक खास विभाग असतो. इथेही माहिती देता येते.




**माहिती देताना पाळावयाची पथ्ये**

१. खरी-खरी माहिती लिहा. उगाचच टोपण नावे वगैरे नका घेऊ.

२. माहिती देताना एक फ्लो ठेवा. मधेच वाहवत जाऊ नका. वर्णनं नकोत.

३. प्रश्नोत्तर स्वरूपात संवाद असेल, तर मोजकंच लिहा. अगदी वस्तुनिष्ठ.

४. जिथे जिथे तुमच्या वेबसाईटबद्दल, सोशल पेजेसबद्दल विचारलं असेल, तिथे तिथे न चुकता, न विसरता ते नोंदवा. त्याला प्रत्यक्ष साईट 'लिंक' करण्याची सोय असल्यास जरूर करा. वेबसाईट असेल, तरच हा प्रश्न उद्भवेल, नसेल तरीही काही बिघडत नाहीये.

५. केलेल्या कामांच्या ठिकाणी पूर्वी केलेली छोटी-छोटी कामेदेखील आवर्जून आठवा, लिहून काढा. काम कसं मिळालं, हे लिहिण्याची आवश्यकता नाही; परंतु काम काय करून मागितले व काय नक्की करून दिले, हे मोजक्या शब्दांत परंतु नेमके नक्की लिहा.

६. तुमचे त्या प्रकारचे विशेष शिक्षण झाले असेल, तर तशी कागदपत्रे तसेच तुम्हाला विशेष करून मिळालेले काही सन्मान व ग्राहकांच्या चांगल्या प्रतिक्रिया हे जरूर अपलोड करा.

७. संपर्कासाठी पत्ता अथवा तपशील देताना- तुमचे कार्यरत दूरध्वनी क्रमांक, SKYPE क्रमांक, ई-मेल इ. व्यवस्थित द्या.

८. ही कामे जगाच्या विविध भागांतून येतात. जास्त करून अमेरिकेतून, ब्रिटन वगैरेतून येतात. त्यांचा Time Zone जाणून घ्या. एकट्या अमेरिकेतच चार Time Zones आहेत. त्याप्रमाणे तुमचं घड्याळ तुम्हाला सेट करावं लागेल. अर्थात ही इंटरनेटवरची मंडळी खूपच जास्त सामावून घेणारी असतात, हे तुम्हाला लवकरच उमगेल.

९. internet वरून काम, म्हणजे 24 x 7 online असं अजिबात नाही. तुमच्या वेळा तुम्ही ठरवा, त्यांनुसार कामे चोख करा. फक्त या प्रोफाईलमध्ये या उपलब्ध वेळा व्यवस्थित लिहून ठेवा. इंटरनेटवरील कंत्राटदारांना चोखपणा अतिशय भावतो.

१०. शेवटचे, परंतु महत्त्वाचे : तुमचा एखादा पासपोर्ट साईजमधला फोटो (एखाद्या व्यावसायिक छायाचित्रकाराकडून काढून घेतलेला) इथे पोस्ट करा. कितीही म्हटलं तरी- First Impression is the Lasting Impression असतंच.

पुढच्या लेखात आपण एखादे 'जॉब पोस्टिंग, कसे करायचे' ते पाहू या.

**मो. ९८५०९९७११०**

❑❑❑

ॲक्टिव्ह टिचर्स महाराष्ट्र या राज्यस्तरीय शिक्षण संमेलन शिर्डी येथे **रचनावादी शिक्षणक्रांती** या प्रा. रमेश पानसे लिखित पुस्तकाचे, राज्याचे शिक्षणसंचालक मा. गोविंद नांदेडे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या पुस्तकावर आधारित शिक्षणवेधचा पुढील अंक सादर करीत आहोत. या पुस्तकावरील आपले विचार, प्रतिक्रिया किंवा प्रश्न आमच्यापर्यंत आवर्जून पाठवा म्हणजे त्याचा समावेश सदर अंकात करता येईल.

'रचनावादी शिक्षण क्रांती' साठी येथे संपर्क साधावा. : ग्रंथाली प्रकाशन, वुलन मिल, म्युनिसिपल स्कूल, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६. दूरध्वनी (०२२) २४२१६०५०, २४३०६६२४.

# सैराट.....

परवा, बसची वाट बघत उभी होते... तेव्हा बाजूला उभ्या असलेल्या दोन मुलींचं बोलणं ऐकत होते... १३-१४ वर्षांच्या मुली होत्या. त्यातील एक जण दुसरीला विचारत होती...

पहिली : ''ए, तू सैराट पाहिलास का?''

दुसरी : ''हो गं, कसला भारी आहे ना सिनेमा...!''

पहिली : ''आणि तो हीरो कसला मस्त आहे ना.....''

दुसरी : ''हो गं ! मला तर तो इतका आवडलाय ना, की एकदा तरी त्याला भेटायचं आहे....''

आणि मग आर्ची, परश्या यांच्या अनेक गोष्टी रंगत चालल्या होत्या त्यांच्या बोलण्यातून...

'सैराट' नावाचा सिनेमा आला आणि त्या सिनेमाने अक्षरशः धुमाकूळ घातला... सगळंच नुसतं 'सैराट झालं जी' गाण्याप्रमाणे दोन-तीन आठवडे चालू होतं. मग 'सैराट' विषयी बोलताना कुणी सिनेमाच्या बाजूने, तर कोणी सिनेमाच्या विरोधात बोलत होतं. मग सिनेमाची उत्सुकता जनमानसात अजूनच वाढू लागली.

खरं तर 'सैराट' या सिनेमाविषयी आपण बोलणार नाही आहोत, परंतु त्यात दाखवलेल्या 'वयात येणाऱ्या' मुलांच्या मानसिकतेबद्दल बोलणार आहोत. या सिनेमात सद्य:स्थितीतदेखील चालू असलेला एक प्रश्न मांडलाय...

या सिनेमाच्या संदर्भात एक प्रश्न मांडला गेला तो म्हणजे- हे मुला-मुलींचे प्रश्न सिनेमातून दाखवू नयेत किंवा यामुळे मुलं भरकटतात. सिनेमा हे मोठ्ठं माध्यम असल्यामुळे ही मुलांमधील मानसिकता खूप पटकन पसरते म्हणून हे विषय असे उघडपणे मांडू नयेत, असे विरोध करणाऱ्या लोकांचे म्हणणे होते.

या सगळ्यांचा विचार करता, म्हणजे सिनेमा किंवा त्याची कथा याचा विचार नाही; तर या वयातील मुलांचा विचार करता, एक तर या वयात स्व-प्रतिमा तयार होऊ लागलेली असते. मी 'माझी एक प्रतिमा' म्हणजे- मी जसा लोकांना दिसला पाहिजे, अशी प्रतिमा तयार करायला लागतो. म्हणून मग मी सगळ्यांना छान वाटेन, असे प्रयत्न सुरू होतात. म्हणजे, एका अर्थाने हिरो किंवा हिरॉईन बनायचे असते.

- म्हणून मग मुलांना सलमानसारखी बॉडी बनवायची असते आणि मुलींचा कल झीरो फिगरकडे असतो.
- वास्तवातल्या जीवनापेक्षा स्वप्नातील दुनिया आवडायला लागलेली असते.
- आई-बाबांपेक्षा मित्र-मैत्रिणी जवळच्या वाटू लागलेल्या असतात.
- शारीरिक, भावनिक, मानसिक विकास या वयात





होत असतो.

- Harmonal Changes होत असतात. त्यामुळे स्वभावात, वागण्यात येणारा भावनांमधील हळवेपणा, तरलता तसेच चिडचिड ह्याही गोष्टी येत असतात.
- हळवेपणा आणि चिडचिड या दोन्ही गोष्टींवर स्वतःहून मात करता येत नसते.
- भावनिक उलघाल वाढलेली असते.
- परस्परविरुद्धलिंगी शारीरिक आकर्षण वाढलेले असते.
- 'मी काहीही करू शकतो किंवा शकते' हे वाटू लागलेलं असतं.
- 'मी एकदम भारी' असंच मन सांगत असतं.
- बुद्धीपेक्षा मनाचे निर्णय जास्त ऐकले जातात.

म्हणून मग- शपथा, वचन यांना महत्त्व येतं....

आपण एकमेकांपासून कधीच दूर जायचं नाही किंवा आपली मैत्री आयुष्यभर राहील, असं मित्र किंवा मैत्रिणींच्या गटांमध्ये ठरतं. पण खरं तर पुढे जाऊन कित्येक वर्षं ही मुलं एकमेकांना भेटतदेखील नाहीत.

- या वयात मला समजून घेणारं कुणी तरी हवं असतं आणि ती व्यक्ती माझ्यासमोर आल्यावर मग मी कुठलाच विचार न करता त्या व्यक्तीसाठी काहीही करायला तयार होतो/होते.
- या वयाला मी मजेने असे म्हणते- भावनांमध्ये खेळणारं किंवा रमणारं वय.

आता थोडंसं मागच्या सिनेमा या विषयावर गेलो तर...

- या वयात करण्याच्या कृतीच्या परिणामांचा विचार केला जात नाही. म्हणजे मगाशी जसं म्हटलं की, मनाने किंवा हृदयाने जास्त निर्णय घेतले जातात.
- सिनेमामुळे प्रत्येकाच्या या वयातील मुलांची खळबळ उघडपणे बाहेर येते.
- 'पुढचं पुढं बघू' हा विचार रुळू लागतो.
- हा विषय खरं तर मुलांपर्यंत पोहोचावा, म्हणून ही वेगवेगळी माध्यमं वापरली जातात; परंतु मुलं हा विषय घरी बोलण्याऐवजी मित्र-मैत्रिणींमध्ये

जास्त चर्चा करतात. त्यामुळे ज्या उद्देशाने विषय मांडला जातो, तो उद्देश बऱ्याचदा थोड्या-फार प्रमाणात सफल होतो.

या सगळ्यापलीकडचा विचार माझ्या मनात येतोय. तो म्हणजे- जी पात्रं अशा नाटकांचा-सिनेमाचा भाग असतात, तीदेखील या म्हणजे वाढत्या वयातील मुलंच असतात. मग ही पात्रं रंगवताना किंवा साकारताना त्यांची भावनिकता किंवा मानसिकता काय होत असेल? हा विषय मला जास्त अभ्यासाचा वाटतो. कारण त्याच वयातील मुलं असल्याने त्यांच्या आत खरं तर ही सगळीच चलबिचल चालू असणार आणि त्यांतून अशा गोष्टींना पोषक असंच वातावरण सिनेमा किंवा नाटकात मिळतं. मग त्यांचा मनाचा विचार केला जातो का? या वयातील भावनिक तरलता समाजापर्यंत उघडपणे पोहोचविताना त्यांची भावनिक गळचेपी तर होतच नसेल ना? एक ना अनेक प्रश्न.

सैराट, बी.पी., टाइमपास यांचे विषय चांगले आहेत, सामाजिक जाणिवेतून आहेत; परंतु हे सगळं करत असताना वाढत्या वयातील मुलं-मुली तसेच त्यामध्ये त्याच वयाचे काम करणारे कलाकार हे आतून किती सैराट होत असतील, माहीत नाही... किती अस्वस्थ होत असतील, माहीत नाही... किती प्रमाणात भावनिक चढ-उतारातून स्वतःला सावरू शकत असतील, माहीत नाही....

असो. हा विषय सिनेमा किंवा तत्सम माध्यमांवर चर्चा करण्यासाठी मांडला नसून, वाढत्या वयातील मुलांच्या भावनिकतेवर प्रकाश टाकण्यासाठी आहे. ह्यात कुठेही, कोणत्याही माध्यमाच्या समर्थनार्थ किंवा विरोधात काहीच म्हणायचे नाही.

**गंपूदादा ९८२३९७०७३१**
**किशोरीताई ९८८११३४१७३**




## मुलांचा चित्रमय महाराष्ट्र

**भूगोल विषयाचे शिक्षण म्हणजे निसर्गाच्या शिक्षणाचेच एक अंग आहे. हा निसर्ग रंगीबेरंगी असतो हे लक्षात घेऊन या 'चित्रमय' महाराष्ट्राची रंगीबेरंगी नकाशाच्या माध्यमातून मुलांना ओळख करून दिली आहे. भूगोल विषयाची गोडी वाढावी व अभ्यास सुलभ व्हावा याबरोबरच तो आनंददायी व्हावा यासाठी या पुस्तकाची आकर्षक मांडणी केली आहे. शेवटी काही स्वाध्याय व कृती करावयासही सांगितल्या आहेत. नाममात्र किंमत हे याचे अजून एक वैशिष्ट्य आहे.**

कर्ता व रचनाकार
**विद्याधर अमृते**

नकाशाकार
**डॉ. प्रसाद गोगटे**

**मनन प्रकाशन**

**मूल्य रु. १००/-**

**ग्राममंगल येथे विक्रीसाठी उपलब्ध.**